# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) छत्रपती संभाजीनगर

## School Leadership Academy, Maharashtra

## सन २०२५-२६

## मोड्यूल क्रमांक : ६६

## स्व -विकासातील स्मार्ट ध्येय निश्चितीत शालेय नेतृत्वाची भूमिका.

**The Role of School Leadership in SMART Goal setting for Self-Development**




**प्रस्तावना -**

मानव संसाधनाच्या विकासाचा गाभा म्हणजे शिक्षण व्यक्ति, समाज, राष्ट्र यांचे संतुलित स्थिती दाखवण्याच्या प्रक्रियेत शिक्षण हे महत्वपूर्ण भूमिका बजावत असते.मूलभूत स्वरूपात असणाऱ्या शिक्षणाचा पाया मजबूत करणारी समाजाचे लघू रूप असणारी संस्था म्हणजे 'शाळा'. त्या शाळेचे व्यवस्थापन, संघटन, सनियंत्रण करणारे नेतृत्व म्हणजे शाळेचे मुख्याध्यापक.

शाळेमधून ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुरू असते यात ज्ञानाचे आदान प्रदानाबरोबर व्यक्तिमत्व विकास, सामाजीकरण यासर्वांची प्रक्रिया सुरू असते.शाळा या शैक्षणिक केंद्रातून विद्यार्थ्यांचा सामाजिकविकास,बौद्धिक विकास, मानसिक विकास, शारीरिक विकास आणि नैतिक विकास घडत असतो. याच केंद्रातून औपचारिक रित्या विद्यार्थ्यांना स्वतःबद्दलची ओळख,सामाजिक परिवेशाची ओळख देखील होत असते. म्हणूनच शाळेला सर्वांगीण

विकासाचा पाया भक्कम करणारे केंद्र मांनले जाते. जॉन डयुई सारख्या विचारवंतांनी शाळेची व्याख्या ही "सामाजिक संस्था" म्हणून केली आहे.यांच्या मते शाळा अशी संस्था आहे जिथे शिक्षणाद्वारे व्यक्तीचा विकास होऊन समाजाची प्रगती साधली जाते.

प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकाची भूमिका ही बहूआयामी असते. मुख्याध्यापकांचे व्यक्तिमत्व बहुअयामी असणे आणि त्यांच्याकडे नेतृत्व क्षमता असणे ही त्या "पदाची गरज."आहे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून ते कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, शिस्त,व्यवस्थापन, भौतिक सुविधांची उपलब्धता करून त्याची काळजी घेण्यापर्यंत अनेक भूमिका करताना सक्षम शालेय नेत्यास कार्यप्रवण असावे लागते. येणाऱ्या अडचणी, आव्हाने स्वतः मधील क्षमता, धोके आणि संधी ओळखण्याचे कौशल्य मुख्याध्यापकांच्या अंगी असणे महत्वाचे ठरते. स्वतःला ओळखण्याचे कौशल्य ज्या मुख्याध्यापकांना अवगत असते, असे सक्षम नेतृत्व आपल्या शाळेसाठी काही ठोस योजना तयार करून शैक्षणिक व्यूह रचनाची आखणी करतात आणि आपल्या शाळेला गुणवत्तापूर्ण यशाच्या उंचीवर नेण्यात यशस्वी ठरतात. अशाच काही मुख्याध्यापकांच्या व्यष्टि वृत्तांतामधून त्यांच्या 'कार्याचा परिचय' घटक संचाच्या माध्यमातून दिल्यास इतर शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळू शकते याच उद्देशाने सदरचे मोड्यूल विकसित करण्यात आले आहे…

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :-**

- शालेय नेतृत्वासाठी स्व -विकासाचे महत्त्व समजून घेणे.
- शालेय नेतृत्वाच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक विकास या करिता SMART ध्येये उपयुक्त ठरतात हे समजून घेणे.
- SMART ध्येये साध्य करण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

**अध्ययन निष्पत्ती :-**

स्व -विकासाच्या स्मार्ट ध्येय निश्चितीत शालेय नेतृत्वाची भूमिका,या मोड्युलचा अभ्यास पूर्ण केल्यावर शाळा प्रमुख खालील बाबी करण्यासाठी सक्षम होतील -

1) शाळेच्या मुख्याध्यापक यांना स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवड, मूल्य ओळखता येतील. त्यांची आत्मजाणीव विकसित झाल्याने अपयशाची कारणे शोधून सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रक्रिया समजेल.

2) शालेय मुख्याध्यापकांनी SMART ध्येयांचे घटक समजून घेतल्याने, त्यांना वास्तववादी ध्येय निश्चित करता येईल.

3) यशस्वी मुख्याध्यापकांनी स्वतः च्या ध्येयपूर्तीसाठी वापरलेल्या पद्धतींचे निरीक्षण करतील.

4) शालेय मुख्याध्यापक स्वतःच्या कार्याचे आत्मपरीक्षण करतील.

5) शालेय नेतृत्वाच्या निर्णयक्षमतेत वृद्धी होईल, संघभावना व सहकार्य वृत्ती विकसित होईल.

**शालेय नेतृत्वासाठी मोडयुलची उपयुक्तता :-**

- स्व विकासाची संकल्पना समजल्याने त्यांच्यामध्ये स्व ची जाणीव [स्वतःबद्दलची जागरूकता ]निर्माण होईल.
- स्वतःच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाचे नियोजन करता येईल.
- स्वतःसाठी SMARTध्येय निर्धारित करून शालेय विकास संपादन करता येईल.
- स्व -विकासातील SMART ध्येयाच्या साह्याने शालेय विकास घडवून आणणाऱ्या "शालेय नेतृत्वाची

"ओळख इतर शाळेतील मुख्याध्यापकांना व सहकारी शिक्षकांना होईल.

- आपल्या शाळा नावारूपास आणणाऱ्या मुख्याध्यापकांच्या कार्यातून इतर मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदरचा विषय घटक संच तयार करण्यात आलेला आहे.

आपल्या कार्याची प्राथमिकता ओळखून कामाला प्राधान्य देणे, इतर सहकाऱ्यांकडे त्यांच्या क्षमतानुसार कार्य सोपवून प्रभावीपणे ते करून घेण्यासाठी आवश्यक ते अधिकार सुपूर्द (Delegate) करणे आणि असलेल्या वेळेचा सदुपयोग करणे, वेळेचे व्यवस्थापन करणे हे एक कौशल्य असते. अनेक आव्हाने अडचणींवर मात करून शालेय नेत्यास शिक्षणाची गुणवत्ता आणि व्यवसायिक विकास वाढविण्याबरोबर एक शैक्षणिक नेता म्हणून प्रशासक आणि व्यवस्थापक असे कार्य करताना शाळेसाठी व्हिजन, मिशन, नियोजन, आखणी करणे, सहकाऱ्यांमध्ये कार्यात्मक क्षमता वृद्धी करणे साध्य होणार आहे .

मुख्याध्यापकांच्या नेतृत्वात शाळेतील इतर घटकांसमवेत सहकारी शिक्षकांना प्रेरित करून विविध कार्याच्या वितरणात समन्वय आणि सकारात्मक शालेय वातावरणात शालेय संस्कृतीची जोपासना कशा प्रकारे साध्य होते याची ओळख या मोड्यूलमधून होणार आहे.

- **विकास संकल्पना** (Development) :- विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असून त्यात समतोलाची अपेक्षा गृहीत धरलेली असते.
  विकास हा क्रमशः होत जातो.
  विकास प्रक्रिया संश्लेषणात्मक असल्याने दिसून येणारे बदल हे विश्लेषणात्मक दृष्टीने न पाहता एकूणात पहिले जातात.

"**स्व- संकल्पना**" -

'स्व 'अशी संकल्पना आहे ज्यामुळे स्वतःच्या दृष्टिकोन आणि क्षमता समजून घेण्यास मदत होते. स्वतःला जाणून घेणे ही सर्व ज्ञानाची सुरुवात आहे.विल्यम जेम्स यांनी 1880 मध्ये सर्वप्रथम "स्व "या संकल्पनेचा उल्लेख केला.त्यानंतर मेरी कॉफीन्स यांनी इसवी सन 1915 मध्ये मानसशास्त्रीय दृष्ट्या स्व चे महत्व सांगितले तर कूफ - कोफका यांनी इसवी सन 1935 मध्ये व्यक्तीचा बोधावस्थेच्या आधारे,कुली व मिल यांनी सामाजिक अंतर क्रियातून आणि हिल कार्ट यांनी इसवी सन 1949 मध्ये मानसशास्त्रीय दृष्ट्या 'स्व जाणिवेचे 'महत्व विशद केले आहे.

विसाव्या शतकात मानवतावादी मानसशास्त्रज्ञांनी 'स्व' संकल्पनेचा विचार करताना असे म्हटले आहे की, व्यक्तीचे बाह्यवर्तन केवळ बाह्य परिस्थितीला दिलेल्या प्रतिसाद नसतो तर व्यक्तीचा स्वतःच्या क्षमता,प्रेरणा, आकांक्षाची त्याचे वर्तन जोडलेले असते. (अरिस्टॉटल)

कार्ल रॉजर यांच्यामते 'स्व' दोन प्रकारचे असतात एक 'वास्तविक- स्व' आणि दुसरा 'आदर्शात्मक- स्व'. वास्तविक स्व,म्हणजे व्यक्ती स्वतः विषयी काय विचार करते?जसे मी कोण आहे? माझ्यामध्ये कोणकोणते गुण आहेत? कोण कोणते कौशल्य आहेत.? माझे छंद कोणते माझ्या सवयी कोणत्या या बाबींचा समावेश होतो तर आदर्श आत्मक स्वमते भविष्य विषयक संकेत असतात उदाहरणार्थ व्यक्तीच्या मध्ये असे कोणकोणते सदगुण आहेत ज्यामुळे त्याच्या इतर सहकारी शिक्षकांमध्ये ते असतील, मी देखील एक चांगला अध्यापक बनू शकेल इत्यादी बाबींचा अंतर्भाव असतो.

"**स्व समजणे**" **का महत्वाचे आहे**?

- "स्व" मध्ये झालेला बदल इतरांवर प्रभाव निर्माण करतो. प्रभावशाली नेतृत्व विकसित होण्यासाठी" स्व"ला समजणे महत्त्वाचे आहे.स्व जाणीव मुळे जीवन यशस्वी व सुखी होण्यास मदत होते. प्रत्येक

व्यक्तीमध्ये भिन्नता आढळून येते आणि प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व असते.व्यक्तीची स्वतःविषयी एक वैशिष्ट्यपूर्ण धारणा असते,स्वतःविषयीची जाणीव होण्यासाठी स्व ' 'समजणे महत्त्वाचे ठरते.

- आत्मविश्वास वाढवणे आणि सकारात्मक दृष्टिकोन तयार होण्यासाठी.
- इच्छित बदलांसाठी,कृतीशील होण्याकरता. (उदा.'मी हे करू शकतो')
- स्वतःचा व्यावसायिक विकास करण्यासाठी.
- आलेल्या संधी ओळखून, त्याचा फायदा घेत स्वतःला समृद्ध करण्यासाठी.
- स्वतःची कामगिरी सुधारण्यास,अर्थपूर्ण ध्येय निश्चित करण्यास आणि करिअर विकसित करण्यास स्व ओळख मदतकार ठरते.
- बॅरन बायरन च्या मते 'स्व संकल्पना ,'म्हणजे व्यक्ती च्या स्वतःबद्दलच्या 'समजूती ' आणि 'स्व -संवेदना 'विषयीच्या माहितीचा संग्रह होय.

रॉबर्ट बॅरन - यांच्यामते, " स्वतःची शरीर संपदा, वर्तन, क्षमता, समजुती, मूल्य आणि व्यक्ती म्हणून केलेले स्वतःचे मूल्यमापन या सर्वांचे संकलन म्हणजे 'स्व 'होय.

क्रेच आणि क्रच फिल्ड - 'स्व ' म्हणजे व्यक्तीचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन.

शेरीप - स्वतःचे शरीर सौष्ठव, क्षमता स्वतः जवळील वस्तू, व्यक्त व्यक्ती, स्वतःचे कुटूंब, समूह, सामाजिक मूल्ये, ध्येय धोरणे, सर्वांसंबंधी धारण केलेल्या अभिवृती म्हणजे 'स्व '.

**स्व - संकल्पनेचे घटक :-**

1. अस्तित्ववादी घटक
2. आंतरिक घटक
3. ' स्व ' ची जाणीव
4. सामाजिक भेद
5. स्व - निर्धार
6. अभिरूची व कृती सामर्थ्य
7. लादलेले गुणविशेष उदा. काही कुटुंबामधून शिस्तीचे गुण विशेष लादलेले असतात. काय करायचे, काय नाही याचे नियम असतात.
8. आंतर वैयक्तिक गुणवैशिष्टय - प्रत्येक व्यक्ती मध्ये स्वतःचे खास गुणवैशिष्टय असतात.

**स्व - ओळखता येण्यासाठी काय केले पाहिजे?**

1. स्व- प्रतिमेचा बचाव
2. स्व - प्रतिभेचे जतन
3. स्व - प्रतिमेचा विकास
4. स्व -प्रेरणा
5. स्व- मूल्यांकन
6. स्व - भावनिक स्थिती व योग्यतेचे मापन.




**स्व- जाणीव विकसित करण्याचे मार्ग**

1. ध्यान करणे (Meditation)
2. योग करणे.
3. दैनंदिनी/रोजनिशी लिहिणे.
4. दुसऱ्याच्या प्रतिक्रिया स्वीकारणे.
5. स्वतःचे SWOT विश्लेषण करणे.
6. वस्तुनिष्ठ पद्धतीने स्वतःकडे पहाणे.
7. स्वतःसाठी जगायला शिकण

**स्व- च्या जाणीवेमुळे काय घडते ? –**

1. जीवनाचा व अस्तित्वाचा खरा अर्थ समजून येतो.
2. आत्मविश्वास, स्वाभिमान व समाधान मिळण्याची क्षमता प्राप्त होते.
3. जीवन यशस्वी व सुखी होण्यास मदत होते.
4. सुदृढ नातेसंबंध विकसित होतात. उत्कृष्ट संवाद साधता येतो.
5. 'स्व'ची जाणीव झाल्यामुळे विद्यार्थी स्वतःवर नियंत्रण ठेऊ शकतील.
6. स्वयंशिस्त, नियमितपणा, वक्तशीरपणा, परस्पर सहकार्य, जबाबदारीची जाणीव इ. गुण मुलांच्या अंगी बाणवले जातील.
7. 'स्व'ची जाणीव झालेली मुले भविष्यात समाजाचा विकास घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावतील.

**स्व - चिंतन -**

'स्व' ची जाणीव होण्यासाठी 'स्व- चिंतनाची' गरज असते. चिंतन करणे हे विचारी माणसाचा स्थायीभाव असतो.भावी समाजाचे आधारस्तंभ असलेल्या विद्यार्थांना घडवणारे मुख्याध्यापक, शिक्षक हे चिंतनशील असावे लागतात. चिंतन ही एक उच्च विचार प्रक्रिया आहे.व्यक्तीला' स्व,'बाबत चिंतन करता येणे आवश्यक असते, त्यामुळे व्यक्तिमत्व विकास घडू शकतो. व्यक्ती जेव्हा स्वतःच्या शारीरिक, बौद्धिक,सामाजिक,भावनिक व कार्यक्षमतांचा शोध घेते, स्वतःमध्ये असलेल्या क्षमतांचा व कौशल्यांचा पडताळात य घेते यालाच 'स्वचिंतन ',असे म्हणतात.

**स्व- चिंतनात पुढील बाबी समाविष्ट असतात -**

1. ज्ञान व माहिती मिळवण्याचा प्रयत्न
2. पूर्व अनुभवाचा अभ्यास
3. सूक्ष्म निरीक्षणातून नोंदी घेणे
4. घटना व सत्यांचा विस्तार करणे
5. विचारांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्याचा प्रयत्न करणे 6)पूर्वग्रह व अंधश्रद्धा यांना दूर ठेवणे
6. तर्कशक्तीचा, अनुमान शक्तीचा वापर करणे
7. कल्पनाशक्तीचा वापर करणे
8. सामान्यीकरण करण्याची योग्यता /क्षमता

**स्व-चिंतनासाठी आवश्यक कौशल्य**

- एखादा घटनेची कार्यकारणमिमांसा करता आली पाहिजे.
- घटनेची कारणे आणि पुरावे यांचा शोध घेता आला पाहिजे. .
- मूल्यांची गृहितके व मूल्य संघर्ष शोधता आली पाहिजे.
- चुकीच्या धारणा घडू नये म्हणून तार्किक कारणमीमांसा व मूल्यमापन करता आले पाहिजे.
- स्वतःच्या मूल्यांची व श्रद्धांची पुनर्रचना करता आली पाहिजे.

**स्व-चिंतन कौशल्य वाढविण्यासाठी काय करावे ? स्व - चिंतन कसे करावे?**

- आग्रह विमुक्तमन ठेवणे [ मनःस्थिर ठेवणे.]
- मानसिक एकांत राखणे [ मनावर इतर प्रभाव नसणे. ]
- व्यत्यय नसणे
- पूर्वज्ञानातून चिंतनास सुरुवात करणे
- माझी मनोभूमिका कशी होती याचे मनन करणे गरजेचे असते.
- स्व चिंतन हे संशोधन प्रणव असावे.(योग्य पध्दतीने पडताळा घेता आला पाहिजे.)
- स्वतःची पूर्वीची मते ठाम करण्यासाठी स्व चिंतनाचा विचार करू नये.
- निराग्रही व सत्यान्वेषक स्व चिंतन करावे म्हणजेच सत्याची कास धरून स्व चिंतन झाले पाहिजे.
- स्व चिंतनातून उत्कृष्टतेकडे जाण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.आपल्या स्वतःच्या मतांचे तौलनिक मूल्यमापन करू नये.

## स्व-विकास संकल्पना :-

व्याख्या - -

**केंब्रिज डिक्शनरी**- स्वतःच्या प्रयत्नाने एखादी व्यक्ती स्वतःमध्ये बदल करत जाते आणि अधिक प्रगत होत जाते ती प्रक्रिया म्हणजेच ‘स्व विकास.

**ऑक्सफर्ड डिक्शनरी** –

एखाद्या व्यक्तीचे चारित्र्य आणि क्षमता विकसित होण्याचे प्रक्रिया म्हणजे स्व विकास. “स्व- विकास” प्रक्रियेची सुरुवात स्वतःला समजून घेण्यापासून होत जाते आणि व्यक्ती आपले कौशल्य,ज्ञान,चरित्र, आणि क्षमता यात सुधारणा करत असते. स्वतःच्या जीवनात सुधारणा येण्यासाठी,ध्येय निश्चित करणे, ते साध्य करताना आत्मजागृतता, सकारात्मक विचारसरणी,नवीन कौशल्य आत्मसात करणे, इत्यादी बाबींचा अंतर्भाव केला जातो. ज्यामुळे व्यक्तीचा समग्र विकास साध्य होतो. थोडक्यात म्हणजे,” स्व विकास “ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्याला झालेली स्वतःची जाणीव,क्षमता, प्रतिभा आणि कौशल्य वाढविण्यासाठी काल मर्यादेत क्षमता पूर्ण केलेली कृती होय. स्व विकास म्हणजे केवळ नवीन कौशल्या आत्मसात करणे किंवा व्यवसायिक यश मिळवणे नाही तर ते स्वतः मधील सुधारणा,लवचिकता, सजगता, दृढ निश्चय,ध्येय निश्चिती या मूल्यांचा स्वीकार करत जीवनातील आव्हाने स्वीकारून आत्मविश्वास पूर्ण ध्येयाच्या दिशेने वाटचाल करणे होय.नेहमी स्वतःचे सर्वोत्तम रूप बनवण्याचा प्रयत्न करणे होय.स्व विकास प्रक्रियेच्या केंद्रस्थानी सतत शिकणे व विकसित होत जाणे समाविष्ट आहे.जागतिक आरोग्य (WHO) संघटनेने विशद केलेली दहा जीवन कौशल्य ही “ स्व विकास” प्रक्रियेतील अंग आहेत.

राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार माध्यमिक शालेय अभ्यासक्रमात’ स्व- विकास’ हा विषय समाविष्ट करण्यात आलेला आहे. याच्या अध्ययन फलनिश्चती मध्ये शालेय जीवनातून बाहेरच्या विश्वात पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना बाहेरीलजगात आत्मविश्वा आत्मविश्वासाने जगण्यासाठी सुसज्ज करण्याचा हेतू आहे.

**स्व - विकासासाठी चार प्रकारच्या जागरुकता**

स्व - जागरुकता (आत्म जागरुकता ) पुढील प्रमाणे

स्व - जाणीव (Self Awareness)

स्व - जाणीवेसाठी व्यक्तीमध्ये कौशल्यच नाहीतर बहुआयामी क्षमता असावी लागते. जी स्वतः मधील आंतरिक बाबींना आणि बाहय संबंधांना कसे दिशादर्शक ठरते, त्यानुसार स्व - जाणीव आकार घेते.आपण स्वतःला कसे पाहतो ? त्याचबरोबर आपल्याकडे इतर लोक कसे पाहतात ?यांचे संतुलन साधणे या पायरी पासून ‘स्व विकास ‘ प्रक्रियेची सुरुवात होते.

1. **स्व- अंतर्मुखता (Self intimity) :-**

   याचा अर्थ व्यक्ती स्वतःचे मूल्य,आवड, आकांक्षा आणि इतरांवर होणारा परिणाम स्पष्टपणे पाहणे होय,.खंबीर अंतर्मुखता असलेले लोक स्वतःची मूल्य,आवडनिवड,आकांक्षा आणि इतरांवर होणारा परिणाम किती स्पष्टपणे पाहतात यावर त्यांची अंतर्मुखता ठरते.ते आपल्या मूल्यांची तडजोड करत नाही. स्वतःच्या मूल्यांशी जुळणारे निर्णय घेणे, ही जाणीव या व्यक्तीसाठी प्रामाणिक जीवन आणि उद्देश पूर्ण कृतींचा पाया म्हणून काम करते.

**2. स्व –बर्हिमुखता :-**

इतर लोक व्यक्तींकडे कसे पाहतात ते त्या व्यक्तीने समजून घेणे ही जाणीव स्वतःचा कार्य कारण हेतू आणि कार्योतोर होणाऱ्या प्रत्यक्ष परिणामांमध्ये अंतर कमी करण्यास मदतगार ठरतो.

**3. सजग स्व –जाणीव :-**

सज़गता तंत्राद्वारे व्यक्ति लगेच प्रतिक्रिया देण्याऐवजी विचारपूर्वक प्रतिसाद देण्याची क्षमता स्वतःमध्ये विकसित करतात सजग 'स्व -जाणीव 'ही कोणत्याही निर्णयाशिवाय व्यक्तीच्या विचारांच्या भावनांच्या आणि शारीरिक संवेदनाच्या वर्तमान क्षणाच्या जाणिवेवर केंद्रित असते.

**4. सामाजिक स्व - जाणीव:-**

सामाजिक गतिशीलता आणि त्यामधील स्वतःचे स्थान समजून घेणे या प्रकारची जाणीव व्यक्तीला नातेसंबंधांमध्ये दृढता निर्माण करण्यास, सामाजिक संकेत ओळखण्यास आणि वेगवेगळ्या संदर्भात स्वतःचे वर्तन योग्यरीत्या जुळून घेण्यास मदत करतात.सामाजिक स्व -जाणीव असलेले नेतृत्व जास्त ' सहयोगी ' असते.

डॉ.ट्रॅव्हिस ब्रॅडबेरी आणि डॉ.जीन ग्रीव्हज हे आपला इमोशनल इंटिलेजेस 2.0 (सॅन दि ए गोसीए, टॅलेंट स्मार्ट 2009-24) या पुस्तकात म्हणतात की,'स्व 'ची जाणीव म्हणजे क्षणात स्वतःच्या भावना ओळखण्याची आणि परिस्थितीनुसार स्वतःच्या प्रवृत्ती समजून घेण्याची क्षमता होय. जी प्रामाणिक समज विकसित असल्यामुळे/ झाल्यामुळे येते.स्व - जाणीव असणे हे भावनिक बुद्धिमत्तेचा आधार स्तंभ मानला जातो.तसेच स्व -नियमन आणि स्व - प्रेरणा विकसित करण्यासाठी तेअत्यंत महत्वाचे ठरते.डॉ. डॅनियल गोलमन यांनी त्यांच्या इमोशनल इंटेलिजंस [ न्युयॉर्क, बँटम बुक्स 2006 -295 ) या पुस्तकात असे म्हटले आहे की, स्व - जागरूकतता ही भावनिक बुध्दिमतेचा प्रारंभ बिंदू आहे.स्व - जाणीव मुळे व्यक्तीला स्वतःची क्षमता आणि कमकुवतपणा ओळखण्याची आणि स्वतःला सकारात्मक पण वास्तववादी दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता प्राप्त होते. स्व - जागरूकता आपल्या अनेक कृतींमधून सुधारण्याची संधी देते, ज्या मुळे व्यक्तीला स्वतःच्या वैयक्तिक जीवनात सहाय्यक ठरतेच तसेच व्यावसायिक जीवनात,करिअरच्या मार्गावर पुर्णपणे नियंत्रण ठेवते. व्यक्ती आपले चिंतन,भावना व्यक्त करणे, संवाद साधणे आणि आपल्या मध्ये असलेल्या अंतर्गत नकारात्मक संवादावर नियंत्रण कसे ठेवावे हे शिकून' स्व - विकास 'साध्य करु शकते.

**स्व -विकासासाठी आंतर वैयक्तिक कौशल्ये :-**

व्यक्तीने इतरांशी संवाद कसा साधावा हे शिकण्यापूर्वी स्वतःशी संवाद कसा साधावा हे शिकले पाहिजे. स्वतःच्या मनातील संभाषणे, मनावर आलेला ताण हाताळणे,सकारात्मक दृष्टीकोण ठेवून स्वत:ला प्रेरित करणे,झालेल्या चुकांवर चिंतन करणे आणि आपले ध्येय निश्चित करणे यावर व्यक्तिमध्ये आंतर वैयक्तिक कौशल्य आकार घेत असतात.ही आंतरिक कौशल्ये आपण दररोजच्या जीवनात कसे विचार करतो, कोणते अनुभव घेतो आणि कसे वागतो यावर प्रभाव टाकत असतात.आंतर वैयक्तिक कौशल्य आपल्याला आवश्यक तेथे थांबण्यास, स्वतःच्या भावना समजून घेण्यास, तसेच विचारपूर्वक निर्णय घेण्यास मदतगार ठरतात.व्यक्तीचे स्व- निर्देशित वर्तन हे त्याला त्याच्या भावना,प्रेरणा, श्रद्धा आणि ध्येय समजून घेण्यास, त्यांना व्यवस्थापित करण्यास मदत करतात आणि व्यक्ती स्वतःची आणि सभोवतालच्या जगाशी कशी जोडली गेली आहे हे दर्शवितात.

**स्व - विकासाचे मुख्य पैलू..**

- स्व जाणीव self awareness .
- कौशल्य विकास skill improvement
- ज्ञानवृद्धी knowledge enhancement
- सकारात्मक विचार positive thinking
- स्वयं - शिस्त self- discipline
- स्व - काळजी self - care

स्व-जाणिवेचे कौशल्य प्राप्त केल्यामुळे स्वयंशिस्त, नियमितता, वक्तशीरपणा, परस्परसहकार्य, जबाबदारीची जाणीव, इ. कौशल्ये विकसित होतात. व्यक्तीला आपल्या सुप्त गुणांचा विकास साधता येतो. कोणत्या ठिकाणी काय बोलले पाहिजे, आपल्या बोलण्या वागण्यामुळे इतरांना त्रास होणार नाही नां याचे ‘ भान ‘ व्यक्तीमध्ये येते. स्वतःची क्षमता, मर्यादा, स्वयं मूल्ये व ध्येयाची जाणीव व्यक्तीला झाल्यामुळे ती व्यक्ती स्वतःला ज्या बाबी जमतात त्याच करण्यास प्रवृत्त होते, आणि आपला वेळ निरर्थक वाया घालवित नाही. स्वतःच्या कार्याचे वेळोवेळी मूल्यमापन करून काही तरी नवीन शिकण्याकडे कल निर्माण होतो. या शिकण्याच्या प्रक्रियेत स्वतःची ‘प्रगती’ साध्य करतात. ही प्रगतीची प्रक्रिया म्हणजेच ‘ स्व- विकास ‘ होय.

**स्व - विकास हा एक मार्ग आहे,-**

- लक्ष्य केंद्रित करा, ध्येय निश्चित करा.
- दिवसाचे नियोजन करा.
- भोवतालचे वातावरण बदला किंवा वातावरणाशी जुळवून घ्या. यासाठी आवश्यक त्या कृती करा, हालचाल करा.
- स्व -विकास ही एक कठीण प्रक्रिया आहे. पण अशक्य नाही.

**स्व-विकास कसा करावा ? (How to practice in development)**

स्व- विकास हा व्यावसायिक यश आणि वैयक्तिक समाधानाचा जीवनमार्ग आहे. स्व -विकास हा वैयक्तिक विकासाबरोबर संघटनात्मक विकासही घडवीत असतो. व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रथमतः स्वतः वर त्याने काम केले पाहिजे. काय साध्य करावयाचे आहे हे लक्षात घेऊन ‘ध्येय’ ठरविले पाहिजे.

**Personal growth Frame**



## केसस्टडी -1

## शाळेचे नाव :-विकास हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कन्नमवार नगर ,विक्रोळी (पू.) (URC-3 घाटकोपर) मुंबई.

## मुख्याध्यापक - श्रीम. वैष्णवी विकास राऊत.

"स्वतःला आनंद होईल अशी प्रगती साधण्याचे ध्येय", ठेवणाऱ्या मुंबई मधील विक्रोळी स्थित "विकास हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज "च्या मुख्याध्यापिका श्रीमती वैष्णवी विकास राऊत यांनी आपल्या वागण्याचा इतरांवर कसा परिणाम होतो हे समजून घेतल्याने,स्वतःची भावनिक बुद्धिमत्ता विकसित केली, स्वतःचे नेतृत्व शैली सुधारली आणि अधिक सुलभतेने त्या कार्य करू लागल्या. सन 2000 पासून त्यांनी अध्यापनाला सुरुवात केली आहे. 2003 ते आजतागायत त्यांनी मुख्याध्यापक म्हणून आपल्या शैक्षणिक संस्थेला नावलौकिक प्राप्त करून दिले.पण त्यासाठीची त्यांची ही प्रगतीपथावरची वाटचाल सोपी नव्हती.स्वतः एम कॉम झाल्यानंतर नोकरीला सुरुवात केली. जसजशी शालेय नेतृत्वाची जबाबदारी त्यांच्यावर येऊ लागली त्या परिस्थितीनुसार त्यांनी स्वतःवर देखील लक्ष केंद्रित केले. बीए,बीएड, एम.ए. (एज्यू) डी. एस.एम.सारख्या शैक्षणिक व्यावसायिक अर्हता संपादन केल्या, श्रीमती राऊत मॅडम यांना SMART Goal चे महत्व असल्याने प्रत्येक कामाचे योग्य नियोजन करून वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण कार्य करण्याकडे त्यांनी विशेषत्वाने लक्ष दिले.म्हणूनच सन २००९ पासून आज पर्यंत शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग ' S' वॉर्ड च्या सहनिमंत्रक म्हणून कार्यरत आहेत. 2010 पासून विद्या विकास एम्पलौईज क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत.विकास स्पोर्ट्स अकादमीच्या अध्यक्ष म्हणून गेल्या वर्षापासून काम बघत आहेत.यासाठी त्यांना स्वतःमध्ये नेहमीच बदल करून सुधारणा घडवून आणाव्या लागल्या.परिणामी कार्योत्तर पावती म्हणून अब्राहम लिंकन हेडमास्तर पुरस्कार (2010 -2011) सावित्रीबाई फुले फातिमा शेख स्फूर्ती पुरस्कार (2016) कोरोना योद्धा पुरस्कार 2021 पुनःश्च अब्राहम लिंकन हेडमास्तर पुरस्का (2010 -2011) सावित्रीबाई फुले -फातिमा शेख स्मृती पुरस्कार (2016), करोना योद्धा पुरस्कार (2021) अब्राहम लिंकन हेडमास्तर पुरस्कार (2020-21) भविष्यातील बदलांकरिता नवोपक्रम या विषयावर आधारित रिसर्च प्रोजेक्टसाठी CMS world Unity convention centre Lucknow (U.P) यांच्यातर्फे पुरस्काराने सन्मानित झाल्या. शाळेसाठी मनुष्यबळाची मोठी कमतरता त्यांच्यासमोर होती. शैक्षणिक,सामाजिक,राष्ट्रीय भान ठेवून स्वतःच्या विकासा बरोबर श्रीमती राऊत मॅडम यांनी आपली आयएएसओ (ISO) शाळा प्रमाणित केली.त्यासाठी निपा, SCERT, RMSA ची अनेक प्रशिक्षणे घेतली . विपश्यनाचे प्रशिक्षण पूर्ण केले. या सर्व प्रशिक्षण ज्ञानातून स्वतःचा विकास साधला त्याबरोबर शाळेसाठी नवदृष्टिकोन निर्माण केला. विद्यार्थ्यांच्या अंगी शालेय विषयानुसार गुणात्मक संपादणूकीबरोबर नवीनतम ज्ञान मिळवण्यासाठी अनेक उपक्रमाची आखणी केली.त्यांचे मूल्यांकन करून सर्वसमावेशक अभिप्राय दिले.जे विद्यार्थी मागे पडत आहेत,त्या वर्गातील शिक्षकांना सुधारणात्मक उपाययोजनाची आखणी करताना मदत केली, या उपाययोजनाची ठोस अंमल बजावणी करुन घेतली. विद्यार्थ्यांमध्ये देखील स्वजागरुकता, सहानुभूती,समानुभूती,नातेसंबंध टिकवण्याचे कौशल्य,अशा कौशल्याची वृद्धी करून त्यांच्या सामाजिक,भावनिक विकासावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक,भावनिक, सामाजिक विकासात त्यांच्या पालकांची देखील मदत घेतली. शाळेत मनुष्यबळाची जरी कमतरता असली तरी उपलब्ध मनुष्यबळाचा वापर त्या करतात.बहुकार्यप्रवणतेवर त्यांचा विश्वास आहे. आपल्या सहकारी शिक्षकांना त्यांच्या कामाची शाबासकी म्हणून *स्टार टीचर *असे पारितोषिकरुपी शाबासकी देऊन प्रेरणा देतात.





विद्या विकास एज्युकेशन सोसायटी, विक्रोळी

बोधवाक्य

प्रज्वलितो ज्ञानमयोदीप:

अर्थ : ज्ञानरुपी दिवा अखंड प्रकाशित करणे.

आमची दूरदृष्टी (Vision)

मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाची दर्जेदार शिक्षण देणारी सर्व शैक्षणिक साधनांनी युक्त व समाजाच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करणारी शिक्षण संस्था म्हणून कार्यरत रहाणे.

आमचे जीवित कार्य (Mission)

शिक्षणाविषयी समाजामध्ये सामाजिक आकांक्षांची स्पंदने प्रतिबिंबित करणे.

आमची उद्दिष्टे (Objectives)

१) ज्यांच्या जीवनात अंधार आहे त्यांना ज्ञानाचा प्रकाश देणे.
२) शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
३) विद्यार्थ्यांना ध्येय निश्चितीसाठी मार्गदर्शन करणे.

आमचे ध्येय (Goals)

- समाजातील दुर्बल घटकांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे.
- सर्जनशीलता, विश्लेषणात्मक कौशल्य, व्यवसायाभिमुख शिक्षण व जागतिक परिवर्तनाच्या दिशा यांचे एकत्रीकरण असलेले शैक्षणिक कार्यक्रम राबविणे.
- तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवून आंतरराष्ट्रीय शिक्षणाची गुणवैशिष्ट्ये जोपासणे.
- जागतिकीकरणाच्या दृष्टीकोनातून मूल्याधिष्ठीत शिक्षणाची जोपासना करणे व राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविणे.

आज शाळेचा पट 430 आहे शाळेच्या गुणवत्तेसाठी सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या सहकार्याने गेली आठ वर्ष तंबाखू मुक्त शाळा अभियान याची यशस्वी अंमलबजावणी केली आहे.तसेच शालेय विद्यार्थ्यांकरीता रोबोटिक्स, ब्युटी कोर्सेस, स्पोकन इंग्लिश,संगीत,गायन,हेल्थ मॉनिटर,मोबाईल रिपेरिंग इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रम यशस्वीरित्या राबविले जात आहेत. तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांच्या सहकार्याने टॅब वाटप करून गेले चार वर्ष उमंग स्पोकन इंग्लिश,जलद गतीने अभ्यास, स्कॉलरशिप, शिक्षकांकरता गुरु सेहतउपक्रम, विपश्यना प्रशिक्षण,,विद्यार्थिनींच्या आरोग्यकरिता किशोरी सेहत उपक्रम राबविले जात आहेत. विविध व्यावसायिक विकास प्रशिक्षणा बरोबर Financial literacy बाबत सातत्याने मार्गदर्शन दिले जात आहे. जरी, शाळेत 13 पदे रिक्त असली तरी शाळेचे नेतृत्व करताना श्रीम.राऊत मॅडम यांनी सर्व आव्हाने लक्षात घेवून त्यावर मात करत शै.वर्ष 2024 - 2025 मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत वॉर्ड स्तरावर पहिला क्रमांक घेऊन शाळेला रु. तीन लाख रक्कमेचे पारितोषिक मिळवून दिले आहे. काव्य, लेखनाचा छंद जोपासत एक प्रतिभावंत लेखक म्हणून ही आपली प्रतिष्ठा जोपासली आहे.

**चिंतन प्रश्न :-**

मुख्याध्यापक आपल्या सहकारी शिक्षकांना '*स्टार टीचर ' हे पारितोषिक देतात,ज्याचा त्या शिक्षकांना काय फायदा होत असावा, आपले मत द्या.

## Self - Development Goals.
## स्व - विकासाचे ध्येय.

**A) व्यावसायिक आणि कौशल्याधिष्ठित ध्येय.**

- वेळेच्या व्यवस्थापनात सुधारणा.
- नवीन कौशल्य आत्मसात करणे.
- नेतृत्व क्षमतेत वाढ .
- समाज संवाद वृद्धी .
- विषयावर प्रभुत्व

**(B) भावनिक आणि मानसिक व ध्येय.**

- भावनिक बुद्धिमता विकास.
- आत्मविश्वासास चालना.
- सजगतेचा सराव व उपक्रमाद्वारे वर्तमान क्षणावर लक्ष केंद्रित.
- ताणतणाव व्यवस्थापनात सुधारणा.
- भावनिक आणि मानसिक ध्येयात वाढ.

**(C) आरोग्य आणि जीवन शैलीचे ध्येय.**

- शारीरिक आरोग्यात सुधारणा.
- सकाळचा दिनक्रम तयार करणे.
- उत्पादकतेत वृद्धी.
- तंत्रज्ञानाचा समतोल वापर.

**(D) सामाजिक आणि नातेसंबंधी ध्येय.**

- भक्कम आधार प्रणाली बनविणे.
- संवादकौशल्यात सुधारणा.
- संघर्षनिवारण कौशल्यात सुधारणा.

**ध्येय निर्धारणाच्या सात पायऱ्या**

- तुम्हाला जो परिणाम पाहायचा आहे त्यातील बदलावर विचार करा.
- SMART ध्येय तयार करा.

- तुमचे ध्येय लिहून ठेवा.
- कृती आराखडा तयार करा.
- कृती करण्यासाठी वेळेची मर्यादा तयार करा.
- कार्यक्रमाचे पुर्नूल्यांकन आणि मूल्यांकन करा.
- स्व विकास मध्ये “विकास कौशल्यांसाठी “संरचित दृष्टिकोन आणि परिवर्तन साठी जाणीवपूर्वक प प्रयत्नाचीआवश्यकता असते विकास प्रक्रियेत पुढे जाण्यासाठी ध्येय असल्याने कार्यसाध्य करायचे आहे याची दिशा मिळते. लक्ष केंद्रित करण्यासाठी ते मदतीचे ठरतात प्रथमता वास्तववादी आणि मोजता येण्याजोगे ध्येये निश्चित करावी लागतात. ध्येय निर्धारण तंत्र म्हणजे स्मार्टच्या संक्षिप्त रूपाचा विचार होतो.ध्येय विशिष्ट मोजता येण्याजोगी,साध्य करण्यायोग्य व वेळेचे बंधन घालणारे असल्यास स्वतःचा विकास करण्यासाठी स्पष्ट दिशा देतात.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञानी एल्बर्ट हबर्ड (Elbert Hubbard) यांनी आपल्या ‘द बुक ऑफ बिझनेस ‘या पुस्तकात म्हटले आहे की, बरेच लोक त्यांच्याकडे बौद्धिकता किंवा धैर्याचा अभाव नसतानाही व्यवसायिक जीवनात अपयशी ठरतात.कारण त्यांनी त्यांची ऊर्जा एका ध्येयाभोवती संघटित केलेली नव्हती. त्यांना त्यांच्या यशाची शक्यता वाढवण्यासाठी,प्रयत्नना व्यवस्थित करण्याचा एक मार्ग हवा होता तो त्यांच्याकडे नव्हता म्हणजेच ध्येय नसल्याने ते अपयशी ठरले.

**SMART ची उत्पती: -**

२० व्या शतकाच्या शेवटी शेवटी स्मार्ट ध्येयाचे महत्व वाढविण्यास मदत झाली. SMARTहे संक्षिप्त रूप प्रथम नोव्हेंबर 1981 मध्ये स्पोकन वॉशिंग्टन येथे लिहिले गेले. वॉशिंग्टन वॉटर पावर कंपनीचे सल्लगार आणि कॉर्पोरेट प्लॅनिंग चे माजी संचालक जॉर्ज टी. डोरन (गेरऑर्गे डोरान ) यांनी” देअर इज स्मार्ट वे टू राईट मॅनेजमेंट गोल्स अँड ऑब्जेक्टिव्ह “. या शीर्षका चा एक पेपर प्रकाशित केला यामध्ये डोरन यांनी “SMART “ या संक्षिप्त रुपा च्या वापराबदल स्पष्टता दिली. डोरन यांनी ‘ SMART ‘ची व्याख्या पाच निकषांमध्ये बांधलेली आहे.
**S - Specific (विशिष्ट) - सुधारणेसाठी विशिष्ट क्षेत्रनिश्चित असावे. ध्येय स्पष्ट आणि नेमके असावे. उदा. व्यक्तिमत्व सुधारण्या सारी 30 मिनिटे वाचन करणे.**
**M - Measurable - (मोजता / मापन करता येण्याजोगे) - प्रगतीचे सूचक मोजता आले पाहिजे. उदा. महिन्याला दोन पुस्तक वाचणे.**
**A - Achievable - (साध्य करता येणारे / साध्य करण्या योग्य) - ध्येय साध्य करताना कोण, व काय लागेल ते निर्दिष्ट केले पाहिजे.उदा. दररोज 2 तास अभ्यास करणे.**
**R - Realistic - (वास्तवादी) - उपलब्ध संसाधने संबंधित बाबी वापरून कोणते परिणाम प्रत्यक्षात साध्या होतील ते सांगता आले पाहिजे. ध्येय आपल्या गरजा आणि विकासाशी संबंधित असावे. उदा. शिक्षकांसाठी संवाद कौशल्य वाढविणे.**
**T - Timely / Timebond - (वेळेची स्पष्टता) - प्राप्त होणारा निकालाचा कालावधी किंवा निकाल कधी मिळवता येईल त्याचे स्पष्टता असावी. ध्येयासाठी ठराविक वेळ असावा. उदा. 3 महित्यात संगणक कौशल विकसित करणे.**

**SMART** लोकांना ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करताना स्पष्टपणे विचार करण्यास आणि परिभाषित करण्यास प्रवृत करते.त्यामुळे ध्येय साध्य होण्याची शक्यता वाढते.
[डोरेन, जी.टी.(1981) " व्यवस्थापनाचे ध्येय आणि उद्दिष्ट लिहिण्याचा एक स्मार्ट मार्ग आहे. "व्यवस्थापन पुनरावलोकन, खंड 70, अंक11, पृष्ठ 35-36 ] .

**SMART** या संक्षिप्त रुपात A आणि R हे एकमेकांशी जास्त घनिष्ट रुपात जोडलेले असतात. प्राप्त होण्या योग्य ध्येया बरोबर स्वतःला यथार्थवादी असतील अशी ध्येय निर्धारित करावी लागतात. आपण काय अभ्यासले थोडक्यात - - - -
विशिष्ट - ( **S** ) - ध्येय स्पष्ट आणि नेमकी असावे.
मापन योग्य -( **M** ) - प्रगती मोजण्यासाठी निकष असावेत बेंचमार्कचा उपयोग करावा.
साध्य - ( **A** ) -ध्येय आवाक्या बाहेर नसावे, ते साध्य करता येण्यास सहज असावे.
यथार्थ वादी-( **R** ) - ध्येय स्वतःच्या आयुष्याशी संबंधित आणि वास्तववादी असावे.
समयबद्ध - ( **T** ) - ध्येय पूर्ण करण्यासाठी निश्चित मुदत असावी. (Deadline) म्हणजे काल मर्यादित असावे,वेळेनुसार बांधलेले असावे.




**SMART ध्येयाचे फायदे -**

1. दिशा आणि प्रेरणा मिळते - असे ध्येय स्वतःचा विकास करण्यासाठी दिशा आणि प्रेरणा देतात.काम करताना प्रगतीचा मागोवा घेतल्यास आणि योजना समायोजित केल्यावर येणाऱ्या अनुभवाने प्रेरणा मिळत जाते.
2. संसाधनाचा वापर - वेळ आणि संसाधने ध्येय आयोजित करण्यास मदत करतात.
3. स्पष्टता - ध्येय साध्य करण्यातील अडथळे ओळखण्यास मदत करतात. परिभाषित ध्येय भाषेतील अस्पष्टता दूर करते.
4. मागोवा -ध्येय SMART असल्याने साधकास एक विचार मिळतो की, मला काय साध्य करावयाचे आहे?

ते आपल्या प्रगती च्या प्रक्रियाचा मागोवा ( tracking )घेऊ शकतात. जरी ध्येय पूर्णतः साध्य झाले नाही तरी प्राप्त तथ्यांद्वारे आपली किती संपादनूक झाली आहे आणि किती साध्य करणे बाकी आहे हे समजते.आपण आत्तापर्यंत पाहिले की, ध्येय,उद्दिष्टे हे जीवनाच्या प्रत्येक पैलूंचा एक भाग असतात आणि ते दिशा, प्रेरणा, लक्ष्य आणि महत्त्व स्पष्ट करतात.ध्येय प्रभावी होण्यासाठी ते विशिष्ट असणे आवश्यक आहे.

**A) विशिष्ट ध्येय (S)** पुढील प्रश्नांची उत्तरे देतात - - - -

- या ध्येयामध्ये कोण सामील आहे? त्याला जबाबदार कोण असेल?
- मला काय साध्य करावयाचे आहे? ते साध्य करण्यासाठी कोणते पावले उचलावी लागतील?
- हे ध्येय कोठे गाठायचे आहे?

  मला हे ध्येय का साध्य करायचे आहे या प्रश्नांच्या अनुषंगाने विचार केल्यास व्यक्ती काय ध्येय ठेवत आहे हे जाणून घेण्यास मदत होते. विशिष्ट उद्दिष्टे पूर्ण होण्याची शक्यता जास्त असते.

**B) मापन (M)** –

स्मार्ट ध्येयामध्ये प्रगती मोजण्यासाठी कोणते निकष लावणे आवश्यक ठरते? प्रगतीचा मागवा घेण्यासाठी,प्रगती मोजण्यासाठी कोणते बेंच मार्क आहेत ? कोणते बेंचमार्कसमाविष्ट केले पाहिजे ? उद्दिष्ट हे मोजता येण्याजोगे असणे,प्रगतीचा मागोवा घेणे आणि अंतिम ध्येयाच्या अंतिम रेषेवर आपण कधी पोहोचलो हे जाणून घेण्यास सोपे करते. कोणत्याही कार्यप्रक्रियेत जर कोणतेही निकष लावले नसल्यास आपण आपली प्रगती ठरवू शकणार नाही.

**C) साध्य (A)** –

साध्य करण्यायोग्य असल्यास त्यातून ध्येयाकडे जाण्याची वाटचाल,आखणी करता येते. ध्येय साध्य करण्याचे मार्ग शोधण्यात आणि त्या दिशेने कार्य करण्यास मदत मिळते.आपले ध्येय हे वास्तववादी आहेत का ?यासाठी उपलब्ध संसाधने कोणती आहेत ?आणि वेळ किती लागणार आहे ?हे लक्षात घेतल्यास ध्येय साध्य करण्याची शक्यता जास्त राहते.

**D) यथार्थवादी (R)** - स्वतःला विचारा - -

साध्य करावयाची ध्येय वास्तववादी आणि आपल्या आवाक्यात आहे का?

काल मर्यादा आणि संसाधनाची उपलब्धता पाहता ध्येय गाठता येणार आहे का ?ध्येय साध्य करण्यासाठी स्वतःकडे तेवढी संसाधने आणि क्षमता आहेत का ?नसल्यास काय कमावले जाणार आहे?नुकसान काय होणार आहे ?

**E) कालमर्यादा (T)** –

ध्येय विकसनात वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे.कारण ते गाठण्यासाठी शिस्त, तातडीची भावना, आणि योग्य दिशा, प्रदान करते.ध्येय योग्य वेळेत योग्य नियोजन (planning) असणे हे ध्येय साध्य करण्याचे प्रमुख सूत्र ठरते. काल मर्यादा असलेले ध्येय निश्चित केल्यामुळे कामाला एक रचना तर मिळतेच व कामाची प्रगती मोजता येते. मुदत(deadline )असल्यामुळे काम पुढे न ढकलता वेळेवर पूर्ण करण्याची प्रेरणा मिळते आणि महत्वाचे म्हणजे वेळेच्या नियोजनामुळे श्रम आणि पैसा वाया जात नाही.




**ध्येय साध्य करण्यासाठी स्वत:ला प्रश्न विचारा —**

- वेळेचे सूक्ष्म नियोजन केले आहे का ?
- वेळेच्या नियोजनाप्रमाणे त्या त्या वेळी संसाधनाचा कार्यक्षम वापर होत आहे का ?
- महत्त्वाचे आणि तातडीचे काम ओळखून प्राधान्यक्रम ठरविला आहे का ?
- बरेच कार्य पूर्ण करण्यासाठी कामाचे वितरण योग्य क्षमतांच्या व्यक्तीकडे झाले आहे का?
- वेळे संबंधित मापदंड अंतर्भूत आहेत का? कार्यक्षमता वाढवण्यासाठी वेळेच्या व्यवस्थापनात काही योजना केली आहेत का ?
- To - Do List दररोजच्या कामाची यादी तयार आहे का?
- प्रत्येक टप्प्यावर फीडबॅक घेण्यासाठी वेळेचे नियोजन झाले आहे का? आपले ध्येय कधीपर्यंत साध्य करावयाचे आहे ? SMART ध्येय हे कालबद्ध असले पाहिजे. कारण त्याची सुरुवात आणि समाप्ती याचा दिवस फिक्स असतो. ध्येयात वेळेचे बंधन राहिल्याने ध्येच साध्य करण्याची प्रेरणा ही प्रवाही राहते.

SMART या संक्षिप्त रुपाची आता पर्यंत आपण ओळख करून घेतली. स्व विकासामध्ये स्मार्ट ध्येय असल्यास अनेक फायदे होतात, त्याचे महत्व आपण अभ्यासले आता 'प्रभावी स्व -विकास'यामुळे होणारे लाभ आपण अभ्यासू.

**स्व - विकासाचे लाभ - – [ Benefits of self - development ) : -**

- स्व- जाणीव आणि स्व -चिंतनामुळे स्वत:ची ओळख होते.क्षमता,कमकुवतपणा समजून येतो. नैतिक मूल्यांचे पालन होते. उच्च चरित्रे आणि अनेक जीवन कौशल्यांची वृद्धी होते.तसेच सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात संतुलन राहते.

- आत्मविश्वास आणि समाधान -नवीन कौशल्यांमध्ये प्रभुत्व मिळवल्याने आत्मविश्वास मिळतो. प्रगतीमुळे समाधान प्राप्त होते. आव्हानांना धर्योने आणि आशावादाने तोंड देण्यास मदत मिळते.
- अनुकरण क्षमता (Adaptability) वाढते म्हणजे कोणत्याही नवीन परिस्थितीमध्ये जुळून घेण्याचे क्षमता वृद्धींगत होते.
- स्व व्यवस्थापन (self management) - आपले विचार भावना आणि उपलब्ध वेळ मिळणाऱ्या संधी यांच्यावर नियंत्रण करून व्यवस्थापन करण्याच्या कौशल्य वाढते.
- स्व विकासाचे तत्व म्हणजे सतत शिकणे.नवीन कौशल्य आत्मसात करणे, नवनवीन ज्ञानआणि तंत्रज्ञान आत्मसात करून व्यक्ती स्पर्धात्मक राहते.म्हणजेच स्पर्धेत टिकून राहते.
- स्वतःच्या मूल्यांबद्दल,ध्येयांबद्दल, भावनांबद्दल आणि वर्तनाबद्दल स्पष्टता व्यक्तीला मिळते. भावनांचे नियमन होते. वैयक्तिक सुधारित क्षमतांमुळे कामाच्या ठिकाणी सुधारणा होऊन उत्पादकता वाढीस लागते.
- स्व - विकासातून व्यवसायिक यश मिळते. सुखी जीवन,ताण तणाव मुक्त,आनंदी आयुष्य जगण्यास मदत होते,स्वयंशिस्त विकसित होते, एकाग्रता आणि शिस्त हे प्राधान्याची कामे पूर्ण करण्यास मदत करतात.म्हणजेच व्यक्तीला तातडीच्या कामांकडे वळण्यापूर्वी महत्त्वाचे काम पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध रहावे लागते. वेळेच्या नियोजना बरोबर सकारात्मक शिस्त निर्माण होते.
- चांगले निर्णय घेतले जातात स्वतःला समजून घेतल्याने व्यक्तीकडून असे निर्णय घेतले जातात जे त्याच्या ध्येयांशी,मूल्यांची आणि परिस्थितीशी जुळतात. जेव्हा व्यक्ती स्वतःला समजून घेते तेव्हा इतर सर्व गोष्टी समजणे त्याला सोपे होते.

## स्व- विकासासाठी शासन स्तरावरील धोरणे, शिफारसी आणि आजची सद्यस्थिती:-

भारतामध्ये स्व विकास,स्मार्ट ध्येय,लाईफ स्किल्स, होलिस्टिक डेव्हलपमेंट, स्किल डेव्हलपमेंट आणि 21 वे शतकातील कौशल्य या संकल्पना विशेषतः नॅशनल एज्युकेशन पॉलिसी 2020 नंतर अधिक व्यापकपणे राबवल्या जात आहेत. त्यांना अधिक धोरणात्मक दिशा मिळाली आहे. परंतु या आधीही या संदर्भाने महत्त्वाचे प्रयत्न झालेले आहेत.

### A) देशपातळीवरील पूर्वीचे प्रयत्न -

**I) NCF (National curriculum framework) 2005 आणि SCF (राज्यस्तरीय अभ्यासक्रम आराखडा) या मध्ये शिक्षणातून स्व -विकास -**

विद्यार्थ्यामध्ये विविध जीवन कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.स्व - विकास व सर्वांगीण विकास यावर शालेय शिक्षणातून भर देण्यात आलेला आहे.

**NCF + SCF = Holistic Development**

- बौद्धीक कौशल्य - (cognitive skills ) -----

  स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित करणे, यामध्ये चिकित्सक विचार, समस्या निराकरण, तार्किक विचार यांचा समावेश आहे.
- संवाद कौशल्ये - (Communication skills )

  सामाजिक व व्यावसायिक यशासाठी आवश्यक, बोलणे,ऐकणे, वाचन, लेखन, प्रभावी संवाद यांचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे.

- सामाजिक कौशल्ये ( social skills )

  समूहात कार्य करण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी, टीमवर्क, सहयोग, समानानुभूती (empathy) या कौशल्य वृद्धीचे उपक्रम समाविष्ट आहेत.
- भावनिक कौशल्ये [Emotional skills)

  मानसिक संतुलन व आत्म नियंत्रण राहण्यासाठी स्व -जाणीव,भावनिक बुद्धिमत्ता,ताणतणावाचे व्यवस्थापन या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.
- सर्जनशीलता व नवोन्मेष ( Creativity &Innovation )

  नवोन्मेष संस्कृती निर्माण करण्यासाठी या कौशल्या वर भर देण्यात आला आहे.
- मूल्याधिष्ठित कौशल्ये ( Value based skills)
- जबाबदार नागरिक घडवण्यासाठी महत्वपूर्ण मानले आहे. यासाठी नैतिक मूल्ये,जबाबदारी आणि संविधानिक मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रम योजले आहे.
- जीवन कौशल्य शिक्षण ( Life skills Education)- देशा मध्ये 2000 नंतर युनिसेफ सीबीएससी आणि एनसीईआरटी यांच्या माध्यमातून जीवन कौशल्य शिक्षणावर भर देण्यात आला.

**NCF & SCF या दोन्ही अभ्याक्रमात पुढील समानता दिसून येते.**

1. Holistic development
2. Activity based learning
3. Child centred approach

- Skilled based educationयावर भर देण्यात आला आहे. NCF & SCF मध्ये शिक्षणाला केवळ ज्ञाना पुरते मर्यादित न ठेवता विविध कौशल्यांचा विकासाद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व स्व -विकास साध्य करण्यावर भर दिलेला आहे.
- CBSE च्या "Adolescent Peer Educators Leadership Program” अंतर्गत: -
- 2560 शाळांचा सहभाग
- 9000 विद्यार्थी व 4200 शिक्षक सहभागी
- 4968 विद्यार्थी व 2484 शिक्षक प्रशिक्षित
- 2 कोटींपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना लाभ

**Skill India Mission (2015)**

स्किल इंडिया मिशन अंतर्गत युवकांच्या स्वावलंबन व कौशल्य विकास यावर भर देण्यात आला.

**महत्त्वाची योजना :-**

पी एम के व्ही वाय (प्रधान मंत्री कौशल विकास योजना) :- phase 1 देशात मध्ये 19.85 लाख युवक प्रशिक्षित. राज्यात PMKVY 4 .0 अंतर्गत 36 जिल्ह्यांमध्ये 684 प्रशिक्षण केंद्र सुरु असून 90034 युवक प्रशिक्षित

- Jan Shiksha Sanstha
- Skill hub initiative
- Digital skill training

B) **NEP 2020 नंतरचे बदल :-**

NEP 2020 मध्ये “Holistic Development” आणि “Experiential Learning” यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. यामुळे “स्व - विकास” हा शिक्षणाचा महत्वाचा भाग बनला आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये शिक्षणासह विविध क्षेत्रात स्व - विकास व सर्वांगीण विकास या दोन्हीवर भर देण्यात आलेला आहे. NCF 2005 आणि NEP 2020 यातील फरक आपण पुढील मुद्द्यांच्या आधारे समजून घेवूयां.

| मुद्दा | NCF 2005 | NEP2020 |
|---|---|---|
| दृष्टिकोन | विद्यार्थी केंद्रित | समग्रवबहुविदया शाखीय |
| मुख्य भर | कृतिआधारित अध्ययन | कौशल्य आधारित सक्षमता आधारित |
| कौशल्ये जीवन | कौशल्ये,मूल्ये | 21व्या शतकातील कौशल्य |
| शिक्षण पद्धती | ज्ञानरचनावादी | अनुभवाधारित दृष्टीकोन अध्ययन |
| मूल्यांकन | सातत्यपूर्ण मूल्यमापन | अध्ययन क्षमता आधारित अध्ययन |
| उद्देश | सर्वांगीण विकास | रोजगार कौशल्य नाविन्यता |

## राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 च्या अनुषंगाने स्व विकास:-

भारत सरकारने जाहीर केलेला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. या धोरणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास घडवणे हा आहे. केवळ शैक्षणिक ज्ञान न देता व्यक्तिमत्व विकास,कौशल्य विकास आणि मूल्यशिक्षण यावर विशेष भर देण्यात आला आहे.स्व विकासाच्या दृष्टीने हे धोरण अत्यंत उपयुक्त ठरते. कारण -

- NEP 2020 मध्ये **स्व अध्ययन आणि आजीवन शिक्षण** (self learning & Lifelong learning) यांना प्रोत्साहन दिले आहे.विद्यार्थ्यांना केवळ पाठांतरावर अवलंबून न ठेवता,विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतः शिकण्याची सवय लावली जाते. यामुळे व्यक्ती आत्मनिर्भर बनते आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित होते. •या धोरणात बहूविध कौशल्यांवर (Multidisciplinary skills) भर दिला आहे. कला, विज्ञान, क्रीडा, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांचा समावेश करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाणार आहे. यामुळे व्यक्तीच्या आवडी निवडी ओळखून त्यानुसार स्वतःचा विकास करण्याची संधी मिळत आहे
- NEP 2020 मध्ये **मूल्यशिक्षण आणि नैतिकता** (Ethics & Values) यांना महत्व दिले आहे. प्रामाणिकपणा, जबाबदारी, सहकार्य,संवेदनशीलता यासारख्या गुणांचा विकास केल्याने व्यक्ती केवळ यशस्वीच नव्हे तो उत्तम नागरिक बनणार आहे.
- याशिवाय **तंत्रज्ञानाचा वापर** ( Use of Technology ) वाढवून शिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ केले आहे.डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या गतीने शिकण्याची संधी मिळते, जे स्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. थोडक्यात,नॅशनल एज्युकेशन पॉलिसी 2020 मधील प्रमुख बाबी

1. पाठांतरा ऐवजी कौशल्याधारित शिक्षण ( Skill - based Education )यावर भर देण्यात आला आहे.
2. स्वयं अभ्यास
3. चिकित्सक विचार
4. स्मार्ट गोल आधारित प्रकल्प

5. व्यावसायिक शिक्षण
6. भावनिक आणि सामाजिक अध्ययन
7. व्यावहारिक ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून ते रोजगारक्षम बनणार आहे.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे विद्यार्थ्यांचा स्व विकासासाठी एक प्रभावी मार्गदर्शक आहे. या धोरणामुळे व्यक्ती आत्मनिर्भर, विचारशील, कौशल्य संपन्न आणि नेतृत्व सक्षम बनते.त्यामुळे देशाच्या प्रगतीसाठी हे धोरण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**मुख्याध्यापक विकासासाठी NEP 2020 मधील प्रमुख शिफारसी पुढीलप्रमाणे आहेत :**
**शैक्षणिक नेतृत्व (Instructional Leadership) विकसित करणे**
**मुख्याध्यापक फक्त प्रशासकीय अधिकारी न राहता:**

अध्यापन प्रक्रियेत मार्गदर्शक ,प्रेरक नेता,नवोपक्रम करणारा,शिक्षकांना मार्गदर्शन करणाराअसा असावा, अशी शिफारस आहे. शाळेतील शिकण्याच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे ही मुख्याध्यापकांची प्रमुख जबाबदारी मानली आहे.

**नेतृत्व प्रशिक्षणाची व्यवस्था मुख्याध्यापकांसाठी** Leadership Training School Management Training,Academic Planning,Digital Leadership,Human Resource Management यांसारखे प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याची शिफारस आहे.

**यासाठी राष्ट्रीय स्तरावर:**

National Council of Educational Research and Training, National Institute of Educational Planning and Administration यांच्या माध्यमातून प्रशिक्षण व क्षमता विकास कार्यक्रम सुचवले आहेत.

**सतत व्यावसायिक विकास (Continuous Professional Development - CPD) मुख्याध्यापकांनी दरवर्षी सतत व्यावसायिक विकास करावा अशी शिफारस आहे. यामध्ये:** चिंतनशील नेतृत्व, समस्या निराकरण, डेटा आधारित नियोजन, तंत्रज्ञान वापर,समुदाय सहभाग यांचा समावेश अपेक्षित आहे.

**शाळा संकुल (School Complex) नेतृत्व NEP 2020 मध्ये "School Complex/Cluster" संकल्पना मांडली आहे.**

**मुख्याध्यापकांनी:** विविध शाळांमध्ये समन्वय करणे,संसाधनांचे वाटप,शिक्षक सहकार्य,सामूहिक नियोजन यासाठी नेतृत्व करावे अशी अपेक्षा आहे.

**शिक्षक विकासातील भूमिका ज्यात मुख्याध्यापकांनी**

शिक्षक निरीक्षण,मार्गदर्शन,प्रेरणा,सहयोगी वातावरण निर्मिती यावर भर द्यावा. मुख्याध्यापकांना "Mentor Leader" म्हणून भूमिका दिली आहे.

**प्रशासकीय भार कमी करणे मुख्याध्यापकांना अधिक वेळ शैक्षणिक नेतृत्वासाठी मिळावा म्हणून** अनावश्यक प्रशासकीय काम कमी करणे,डिजिटल प्रणाली वापरणे,सहाय्यक कर्मचारी उपलब्ध करणे.

**तंत्रज्ञान नेतृत्व ज्यात मुख्याध्यापकांनी -** डिजिटल शिक्षण,ऑनलाइन मॉनिटरिंग,डेटा विश्लेषण,ई-प्रशासन यामध्ये कौशल्य विकसित करावे असे धोरण सांगते.

**गुणवत्तापूर्ण भरती आणि पदोन्नती मुख्याध्यापक निवडीत** नेतृत्व क्षमता,शैक्षणिक दृष्टी,नवोपक्रमशीलता अनुभव

**समुदाय व पालक सहभाग ज्यात मुख्याध्यापकांनी** पालक,ग्रामसमिती,स्थानिक संस्था,समाज यांच्याशी समन्वय वाढवून शाळा विकास साधावा असे नमूद केले आहे.

**स्व-विकास आणि चिंतनशील नेतृत्व यात मुख्याध्यापकांनी** आत्ममूल्यांकन,SMART ध्येय निश्चिती,वेळ व्यवस्थापन,भावनिक बुद्धिमत्ता,संवाद कौशल्य यांचा विकास सतत करावा अशी अप्रत्यक्ष अपेक्षा NEP मध्ये व्यक्त केली आहे.

**NEP 2020 मधील मुख्याध्यापकांची अपेक्षित भूमिका:-**
**मुख्याध्यापक असा असावा**

- Visionary Leader
- Learning Leader
- Change Agent
- Community Builder
- Mentor

- **केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने स्व -विकासाच्या संदर्भाने केलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी**
  देशात आणि राज्यात शिक्षण, कौशल्य, डिजिटल उद्योजकता व नवोन्मेष या विविध क्षेत्रातील उपक्रमाद्वारे 'स्व -विकासाला 'चालना दिली जात आहे.या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आपल्या देशात झाल्यास सर्वांगीण विकास साध्य होणार आहे.

**शैक्षणिक क्षेत्र** ( Education sector ) व्यक्तिमत्व विकास व बौद्धिक विकास अंतर्गत केंद्रशासन मार्फत- नॅशनल एज्युकेशन पॉलिसी2020 •NEP2020 - holistic development

- Multi disciplinary education
- Life skills curriculum

**महाराष्ट्र राज्य शासन –**

- Nipun Maharashtra mission
- PMSHRI 'School 's
- Skill based curriculum

**कौशल्य विकास** (Skill Development) रोजगाराभिमुख स्व - विकास केंद्रसरकार -

- Skill India Mission
- PMKVY

**राज्य शासन -**

- Skills on wheels
- Vocational education

**3. डिजिटल क्षेत्र** (Digital Sector) - स्व - अध्ययन संस्कृती जोपासण्यासाठी केंद्रसरकार -

- SWAYAM
- DIKSHA platforms
- Digital India

**राज्यशासन -**

- Smart classrooms
- E - learning systems

**उच्च शिक्षण** - (self - paced development साठी) केंद्रसरकार -

- Academic Bank of credits ( A B C )
- Flexible learning

**राज्य शासन -**

- Credit based system
- Internship programmes

**उद्योजकता व रोजगार** . [Entrepreneurship] केंद्रसरकार -

- Startup India
- Stand up India

**राज्य शासन -**

- Startup policy
- MSME support
  Innovation & Self -reliance

**सामाजिक व व्यक्तिमत्व विकास** (Social Development ) नेतृत्व आणि सामाजिक कौशल्य वाढीसाठी केंद्रशासन आणि राज्यशासनाचे उपक्रम

- NSS - National service scheme
- NYK S - Nehru Yuva Kendra Sangathan ( youth development ) youth training programs
- Leadership development

**विज्ञान व नवोन्मेष ( Innovation ) चिकित्सक विचार व सर्जनशीलता वाढीसाठी -**

Atal Innovation Mission (AIM) भारत सरकारचा नीती आयोगा अंतर्गत (NITI Aayog) चालवला जाणारा एक प्रमुख उपक्रम आहे. या मिशन मुळे नवोन्मेष व उद्योजकतेच्या संस्कृतीला प्रोत्साहन मिळत आहे.

## महाराष्ट्रातील इतर महत्त्वाचे प्रयोग व उपक्रम :-

1. **सक्षम** (saksham ) उपक्रम - हा उपक्रम उद्यम लर्निंग फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने चालू असून 2500 बिजनेस आयडिया सादर झाले आहेत,तसेच 1500 प्रोटोटाइप तयार करण्यात आले आहे.या उपक्रमाचे उद्दिष्ट :

- उद्योजकता वाढविणे,
- नेतृत्व गुण विकसित करणे
- स्मार्ट ध्येय नियोजन करणे
- प्रोजेक्ट बेस्ट लर्निंग आहे.

2. **अनुभव आधारित शिक्षण** ( experiential learning )PARAKH अहवालानुसार महाराष्ट्रातील

- 99% शाळांमध्ये संस्कृती उपक्रम
- 98%शाळांमध्ये क्रीडा कार्यक्रम
- 95%शाळांमध्ये साहित्यिक उपक्रम
- 89% शाळां मध्ये विज्ञान प्रदर्शन झाले

3. **इतर सुरु असलेले प्रयोग - A - Life Skills आणि Mental wellness**

- योग व ध्यान
- भावनिक व्यवस्थापन
- goal setting workshop
- Peer learning

**MIT - WPU च्या Life Transformation कार्यक्रमात**

- मोबाईल मुक्त शिक्षण
- स्वयंशिस्त
- टीमवर्क
- आत्मचिंतन यावर भर दिला जात आहे.

**B - डिजिटल व कौशल्याधारित शिक्षण :-**

- आर्टिफिशल इंटेलिजन्स (A I ) लिटरसी
- कोडींग
- डिजिटल लिटरसी
- कम्युनिकेशन स्किल्स
- करिअर प्लॅनिंग यांना नवीन अभ्यासक्रमात समाविष्ट केले जात आहे.

**राज्यशासनाचा शालेय व सहशालेय पुरक अभ्यासक्रम -**

शालेय शिक्षणात स्व -विकास खूप महत्त्वाचा आहे. कारण तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आधारभूत ठरतो. फक्त पाठ्यपुस्तकतील ज्ञान पुरेसे नसून व्यक्तिमत्व, विचारसरणी आणि कौशल्य विकसित होणेही तितकेच आवश्यक आहे.स्व विकासामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.संवाद कौशल्य सुधारतात आणि त्याचा स्वभाव सकारात्मक होतो.

महाराष्ट्र शासनाकडून शालेयअभ्यासक्रमात 'स्व. -विकास 'स्वतंत्र विषय नसला तरी भाषा, जीवनकौशल्य, नैतिक शिक्षण, वाचन साहित्य यामध्ये 'स्व - विकासाशी 'संबंधित पुस्तके आणि धडे समाविष्ट केलेले आहेत. उदा. पूरक वाचन म्हणून 'श्यामची आई 'पुस्तक- संस्कार व आईचे महत्व समजण्यासाठी,' स्वामी' पुस्तक नेतृत्व व निर्णयक्षमता गुण वाढीसाठी उपयुक्त ठरतात.

- **आंतरराष्ट्रीय स्तरावर स्व -विकास कौशल्य** :-

आंतरराष्ट्रीय स्तरावर ' स्व- विकास ' म्हणजे फक्त नोकरी मिळवणे नाही, तर अनिश्चित जगात टिकून राहण्यासाठी आणि स्वतःला सतत अपडेट ( Up skilling ) ठेवण्यासाठी आवश्यक असणारी मानसिक या व्यावसायिक तयारी होय. या विषयावर खूप मोठ्या प्रमाणावर आणि नियोजनपूर्वक काम झाले आहे.जागतिक स्तरावर याला सॉफ्ट स्किल्स,इमोशनल इंटेलिजेन्सी आणि लाइफ स्किल्स या स्वरूपात पाहिले जाते.आंतरराष्ट्रीय स्तरावर 'स्व -विकास ' याला ऐच्छिक ( ऑप्शनल) न मानता करिअरमधील यशासाठी आणि उत्तम जीवनासाठी अनिवार्य मानले गेले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्षेत्रात झालेले कार्य पुढील प्रमाणे सांगता येईल –
आंतरराष्ट्रीय संस्था आणि फ्रेमवर्क्स

- **UNESCO** (युनेस्को), युनेस्कोने सामाजिक आणि भावनिक शिक्षणावर (SEL) विशेष भर दिला आहे. यामध्ये स्वयं जागरूकता, निर्णय क्षमता आणि संबंध व्यवस्थापन यासारख्या कौशल्यांचा समावेश आहे.
- **CASEL** [Collaborative for academic social and emotional learning) यांनी स्व विकास साठी पाच प्रमुख घटक निश्चित केले आहेत.स्व -जागरूकता, स्व -व्यवस्थापन,सामाजिक जागरूकता,नातेसंबंध कौशल्य आणि जबाबदारीने निर्णय घेणे.
- **जागतिक बँक** (World Bank) - कौशल्य विकासामध्ये केवळ तांत्रिक ज्ञान (Hard skills), नाही तर कॉग्निटिव्ह (ज्ञानात्मक) आणि सोशियो -इमोशनल (सामाजिक - भावनिक) कौशल्यांचा समावेश अनिवार्य असल्याचे जागतिक बँकेने नमूद केले आहे.
- World Economic Forum (WEF) - त्यांच्या 'फ्युचर ऑफ जॉब' अहवालात 21 व्या शतकातील नोकऱ्यांसाठी चिकित्सक विचार [critical thinking], नाविन्यपूर्ण [Innovation], सक्रिय शिक्षण [Active learning] आणि लवचिकता [Resilience] या कोशल्य कौशल्यांवर जोर दिला आहे.

जागतिक स्तरावर सर्वाधिक मागणी असलेली स्व - विकास कौशल्य आंतरराष्ट्रीय अभ्यासानुसार पुढील प्रमाणे महत्त्वपूर्ण मानली आहेत.

1) इमोशनल इंटेलिजन्स (E.Q)

२) भावनिक लवचिकता (Resilience)- संकटातून किंवा अपयशातून सावरून पुढे जाण्याची क्षमता

3) क्रॉस कल्चरल कमुनिकेशन - यामध्ये वेगवेगळया संस्कृतीतील लोकांशी प्रभावीपणे संवाद साधणे हे उदिष्ट आहे.

4) वेळ व्यवस्थापन आणि उत्पादकता - यात काम आणि वैयक्तिक जीवन यात समतोल राखण्यावर भर दिलेला आहे.

5) नेतृत्व आणि पुढाकार - जबाबदारी घेण्याची तयारी अंतर्भुत आहे.

**स्व विकासाचे जागतिक ट्रेंड्स** (2025 - 26 )…..कृत्रिम बुद्धिमत्ता ( A I )आधारित वैयक्तिक शिक्षण,डेटा अनालिस्टिकचा वापर करून प्रत्येकाच्या गरजा नुसार स्व विकासाचे मार्ग तयार केले जात आहेत. मानसिक आरोग्य आणि माईंड फुलनेस यामध्ये तणाव व्यवस्थापन आणि डिजिटल डिटॉक्स वर मोठ्या प्रमाणावर काम होत आहे.आजीवन शिक्षण [ Lifelong learning ] कौशल्य वाढ (upskilling )आणि पुन्हा कौशल्य (Reskilling) ही निरंतर चालणारी प्रक्रिया बनली आहे.

• स्व - विकास कौशल्य शिकण्याचे प्लॅटफॉर्म - Coursera, Linkedin learning, Udemy यासारख्या प्लॅटफॉम्सवर हार्वर्ड,येल आणि स्टेनफोर्ड सारख्या विद्यापीठात कोर्सेस उपलब्ध आहेत, जे वैयक्तिक विकास आणि नेतृत्व गुण विकसित करतात.मेंटलशिप प्रोग्राम द्वारे जागतिक स्तरावर करियर आणि वैयक्तिक विकासावर भर दिला जात आहे.

एका उदाहरणाद्वारे SMARTआणि स्व - विकास संबंध लक्षात घेवूयां -

| **SMART घटक -** | **शासनाचे उपक्रम** |
|---|---|
| 1. Specific | - स्किल बेस कॉर्सस, करियरपथ |
| 2. Measurable | - प्रमाणपत्रे, प्रशिक्षण संस्था |
| 3. Achievable | - प्रशिक्षण केंद्रे,ITI, PMKVY |
| 4. Relevant | - उद्योगाशी संबंधित कौशल्ये |
| 5. Time Bound | - 2030 SDG,NEP उदिष्टे |

केंद्र आणि राज्य सरकारचे प्रयत्न SMART ध्येयांशी पुर्णपणे सुसंगत आहेत.

**स्वाध्याय:**

प्रश्न : NCF व SCF मध्ये अधोरेखित असलेली स्व - विकास कौशल्ये एकमेकास पूरक आहेत का ? याबाबत आपले मत द्या.

प्रश्न: आंतरराष्ट्रीय स्तरावर स्व - विकास कौशल्यावर सुरु असलेले प्रयोग व त्याचे यश या विषयी आपले विचार थोडक्यात मांडा.

**स्व - विकास प्रकियेसाठी खालील बाबी महत्वाच्या आहेत -**

1. **SWOT विश्लेषण** - म्हणजे व्यक्तीने स्वतःच्या क्षमता (strengths), कमकुवतपणा (weaknesses), संधी (opportunity) आणि आव्हाने /धोके (threats) ओळखून योग्य साधनांचा वापर करणे आणि स्वतःमध्ये बदल घडवून आणणे.
2. **कृती नियोजन** - वर्तणुकीतील बदलांसाठी सुस्पष्ट कृती योग्य पावले निश्चित करणे.
3. **जबाबदारी घेणे (Accountability**) - आपल्या आयुष्याची, निर्णयांची आणि परिणामांची जबाबदारी घेणे.
4. **अनुभवात्मक शिक्षण** - व्यावहारिक अनुभवासह उपदेशात्मक शिक्षणाचे संयोजन करणे.
5. **सकारात्मक सवयी अंगी कारणे** - स्वतःची प्रतिमा पुन्हा परिभाषित करण्यासाठी छोट्या सातत्यपूर्ण कृतींवर लक्ष केंद्रित करणे,नकारात्मक विचार डिलीट बाजूला सारून सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे,स्वतःची ही प्रेरणा व्यक्तीला बाहेरील कौतुक व पारितोषिक या सारख्या अमिषांची गरज न पडता ध्येयाकडे ढकलण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.अंतर्गत प्रेरणा उद्देशाच्या तीव्र भावनेतून आणि वैयक्तिक प्रेरणेतून येत असल्याने ती कठीण काळात पुढे जाण्यास मदत करते.
6. **लवचिकता** - समोर असलेल्या अडचणी सोडवणे, व्यक्तीच्या भावनिक मानसिक लवचिकतेमुळे शक्य होते.' सकारात्मकता 'या अडचणीतून सावरण्यास मदतगार ठरते.योजना अयशस्वी झाल्यास हार मानण्याऐवजी लवचिक लोक' अपयशातून' शिकतात.त्यांच्या दृष्टीने 'अपयश' हे यशाची पहिली पायरी ठरते. ते त्यांच्या 'अपयशा'कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतात आणि पुनःश्च प्रयत्न करतात. भारत देशात आणि महाराष्ट्रात शिक्षण, कौशल्य, डिजिटल उद्योजकता, व नवोन्मेष या विविध क्षेत्रांतील उपक्रमांद्वारे ' स्व- विकासाला ' चालना दिली जात आहे.

**स्व-विकासातून सक्षम शालेय नेतृत्वाकडे :-**

यशस्वी नेतृत्वाची ध्येये :-

- वर्गाचे गुणवत्ता पूर्ण व्यवस्थापन
- अध्ययनासाठीच्या संधी पुरविणे
- नाविन्यतेचा शोध घेणे
- सर्जनशील उपक्रम राबविणे
- गरजांची समाधानकारक पूर्तता करणे




'शालेय नेतृत्व' या संकल्पनेत; शालेय नेत्याने स्वतःमध्ये तसेच आपल्या शाळेतील सहकारी शिक्षक, कर्मचारी,विद्यार्थी यांच्यातील क्षमता, दृष्टिकोन आणि मूल्य स्वतःसाठी आणि इतरांसाठी शिकण्याची आणि विकसित होण्याची संधी शोधण्यासाठी शालेय नेत्या सतत स्वतः चिंतन करावे लागेल. तसेच होणाऱ्या आंतरक्रियांमधून सुधारणात्मक बाबी लक्षात घ्याव्या लागतील. नेतृत्व कर्त्यामध्ये विकासाच्या संधी इतरांना उपलब्ध करून देण्यासाठी चिकित्सक भूमिका महत्त्वाची ठरते.

शालेय नेत्याने कृती आधारित चिंतनाच्या केलेल्या सरावांमधून आपल्या शाळेचे नेतृत्व करताना इच्छित बदल घडवून आणण्यासाठी त्या कृती त्यांना अधिक सक्षम बनवतात.यामुळे" मी काय करू शकतो "असा आत्मविश्वास शालेय नेत्यांमध्ये म्हणजेच मुख्याध्यापकांमध्ये निर्माण होतो.वेगळे नाविन्यपूर्ण करण्याची वृत्ती विकसित होते. संघ बांधणी मजबूत होते.अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सुधारणा होते.

## केस स्टडी -2

**आपण मुंबई विभागातील एका उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाची केस स्टडी अभ्यासू -**
**शाळेचे नाव - जिं.प . उच्च प्राथमिक शाळा, वडगाव,तालुका :-खालापूर जि.:- रायगड**
**मुख्याध्यापक - श्री सुभाष रामचंद राठोड.**

स्व विकासाच्या जोरावर आपल्या क्षमता ओळखून महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाच्या" **I want challenge**"या उपक्रमात स्वयं स्फूर्तीने भाग घेत स्वतःचा जिल्हा सोडून **गडचिरोली सारख्या दुर्गम जिल्हयात** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करून **असर आणि NAS** च्या गुणवत्ता यादीत गडचिरोली जिल्हाला **पहिल्या पाच** मध्ये आणण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे श्री सुभाष रामचंद्र राठोड यांच्या मते,त्यांच्या यशाचे गुपित त्यांनी निश्चित केलेल्या"**SMART GOAL** "मध्ये दडलेली आहे. हाच विश्वास त्यांनी आजपर्यंत ठेवला आहे.सन 2023 मध्ये जेव्हा ते रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्याच्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक

शाळा, वडगाव येथे आले, तेव्हा त्या शाळेची पटसंख्या फक्त 32 होती.पण पटसंख्या वाढवणे हे त्यांच्या समोरचे मोठे आव्हान त्यांनी प्रथम उचलले 32 पटावरून शाळा 49 पट संख्येवर आली. पुढे ती वाढत नेत 2025 - 26 मध्ये शाळेची पटसंख्या 103 झाली आहे.




**[जि.प.शाळा पटसंख्या ग्राफ]**

**जि.प. शाळेच्या पटसंख्येचा वाढता आलेख**



## राजिप शाळा वडगाव रायगड जिल्ह्यात प्रथम

### ■ मुंबई विभागात द्वितीय क्रमांक

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव जिल्ह्यात प्रथम, तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांकावर यशस्वी पणे उतुंग झेप घेतली. विविध उपक्रम राबवून या शाळेमध्ये अमुलाग्र बदल घडविला त्याच बरोबर विद्यार्थ्यांची पट संख्येचा अलेख वाढत चालला असून, शाळेमध्ये डिजिटल स्वरुपात, शिक्षण, मतदान गुढी, कंपोस्ट खत या सर्व तत्वाचा आभ्यास करून महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या निष्कर्षावर या शाळेला शिक्षक, शालेय कमिटी यांना शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व धनादेश देवून गौरविण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण सचिव कुंदन, शिक्षण आयुक्त सुरज म ढिरे शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांच्यासह अन्य उपस्थित होते.

असा घडला बदल-





यासाठी “शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी “हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला. सरांनी आपल्या शाळेला गत वर्षी **“मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदरशाळा टप्पा -2 मध्ये जिल्हयात प्रथम व मुंबई विभागात द्वितीय पारितोषिक पटकावून 15 लाख रुपयां चे बक्षीस** मिळवून दिले.हे सर्व यश मिळवणे प्रारंभापासून सहज,सुरळीत नव्हते.अनेक आव्हाने समोर होती. त्यांना तोंड देत आज यशाच्या शिखराकडे धाव घेणाऱ्या श्री सुभाष राठोड या मुख्याध्यापकांनी

स्वतःला झालेल्या ‘ब्रेन CVT” नावाच्या मेंदू कर्करोगावर हिम्मतीने मात केली आहे. पुढे जून 2025 मध्ये जीवघेण्या अपघातात आपला उजवा पाय कायमस्वरूपी गमावला असला तरी सरांनी खच्चून न जाता,निराश न होता,दृढ आत्मविश्वासाने शाळेला गुणवत्तेत अव्वल आणण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत.अखंड कार्यप्रवणता जिद्द चिकाटी सातत्याने पाठपुरावा करून प्रयत्नपूर्वक सुनियोजनाद्वारे आपल्या ध्येय गाठण्याच्या वाटचालीवर मार्गक्रमण करीत आहेत.त्यांच्या मते ‘स्व विकास ’हा व्यक्तीला खंबीर बनवतो व योग्य दिशा दर्शवतो. ते म्हणतात, “मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा “या स्पर्धेच्या यशाचे गणित SMART ध्येयाच्या निकषाचा वापर केल्याने शक्य झाले आहे.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेचे पारितोषिक मिळवून अव्वल येण्यासाठी श्री.राठोड सरांनी स्मार्ट ध्येय निश्चित करताना त्यांच्या टीमने व त्यांनी प्रथम आपल्याला काय साध्य करायचे आहे त्यासाठी उचलाव्या लागणाऱ्या कामाच्या जबाबदाऱ्या कोणत्या व्यक्तीवर सोपवायचे आहेत ?ध्येय साध्य करण्याच्या कोणाया उपाययोजना करणे आवश्यक आहे ?या बाबी लक्षात घेतल्या.शाळेचे मुख्याध्यापक म्हणून आपल्या सहकाऱ्याची टीम मजबूत ठेवणे व त्यांना विश्वास देण्याची महत्त्वाची भूमिका सरांची होती.

श्रीयुत राठोड सर आणि सोबत सहाय्यक शिक्षकांच्या टीमने सकारात्मक काम करण्यास सुरुवात केली . मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेचे निकष लक्षात घेऊन रणनीती आखली पटसंख्या वाढीसाठी वर उल्लेखित “शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी”या उपक्रमाशिवाय “प्रत्येक मूल आनंददायी “,”पिण्याचे स्वच्छ पाणी “,सर्व वर्गात विद्युत पुरवठा,”डिजिटल रूम,”ओला कचरा सुका कचरा “,याची वर्गवारी, कंपोस्ट खत निर्मिती,गांडूळ खत निर्मिती, पाणी आडवा, पाणी जिरवा, वृक्षारोपण व संगोपन संगणक लॅब,असे अनेक उपक्रम राबविले. झाडे लागवड व संगोपनात 100% झाडे जगविण्यात यश आले. या सर्व उपक्रम राबवण्यासाठी CSR द्वारे मदत प्राप्त करून घेतली.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा (2023 - 24 )टप्पा -१ मध्ये सहभाग घेताना श्री राठोड सरांना बऱ्याच ताणाला सामोरे जावे लागले.स्पर्धेत शाळा जिल्हास्तरापर्यंत पोचली पण तालुकास्तरीय तृतीय पारितोषकांवर समाधान मानावे लागले,पुढील वर्षी म्हणजे (2024 - 25 )मध्ये पुन:श्च जास्त श्रम घेण्याचे मुख्याध्यापक राठोड सर व त्यांच्या टीमने ठरवले. यावेळी काही फेरबदल करून उद्दिष्ट साध्य होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापक आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांच्या अंगी असलेल्या क्षमतेचा विचार करून नव्याने कार्य बलगट तयार केला . गतवर्षी राहून गेलेल्या बाबींवर चिंतन विचार करून नेमक्या कोणत्या बाबीं वर जादा लक्ष केंद्रित करावयाचे आहे त्या बाबी लक्षात घेतल्या. जास्त महत्वपूर्ण बाबींवर लक्ष मर्यादित केल्याने नको असलेल्या बाबी त्यांना टाळता आल्या. कमतरता लक्षात घेतांना त्यांच्या असे लक्षात आले की राज्यात प्रथम येण्यासाठी खूप बाबी करणे आवश्यक आहे.ते यावर्षी शक्य होणार नाही,पण त्यांच्या हेही लक्षात आले की काही अडचणी दूर केल्यास आणि जास्त प्रयत्न वाढवले तर विभाग स्तरापर्यंत आपल्या शाळेला नक्कीच यश मिळेल. टीम मधील सदस्यांना प्रोत्साहन मिळाल्याने शाळेसमोरील संभाव्य अडथळे लक्षात घेऊन प्रत्येकाने हिरारीने कार्यास सुरुवात केली . स्पर्धा जिंकण्यासाठी या शालेय नेत्याचे SMART ध्येय होते,”: –

“माझ्या शाळेच्या गुणवत्तापूर्ण बाबी पूर्ण करून मुख्यमंत्री, माझी शाळा सुंदर शाळा राज्यस्तरीय स्पर्धेत निकष निहाय बाबींवर 20% ने वृद्धी करून माझ्या शाळेला राज्य पातळीवरचे पारितोषिक प्राप्त करून देणे. “

**विशिष्ट (S )**

राज्यस्तरीय स्पर्धेत येण्यासाठी स्पर्धेच्या निकष निहाय बाबींची पूर्तता करणे.शाळा प्रमुख म्हणून ते साध्य करण्यासाठी काय करता येईल याची स्पष्टता त्यांनी ठेवली. मुख्याध्यापक श्री.राठोड सरांनी काय,केव्हा,कुठे,कसे आणि काय यासारख्या तपशिलांचा विचार केला होता

**मोजण्या योग्य (M)**

साध्य होणाऱ्या बाबी व त्यामुळे प्रगतीत होणारी वाढ याची नोंद ठेवण्यासाठी स्वतःची डायरी मेंटेन केली.यशाचे मोजमाप करणे शक्य झाले. [2023 - 24] पेक्षा [2024 - 25] मधील यश अधिक आले.

**साध्य करण्यायोग्य (A)**

"मुख्यमंत्री माझी शाळा ', सुंदर शाळा "या शासन पुरस्कृत स्पर्धेच्या तयारीसाठी दररोज शालेय वेळापत्रक पेक्षा जादा दोन तास देण्यात घेण्यात आले.जे त्यांच्याआवाक्यात आहे, त्यासर्व बाबी त्यांनी लक्षात घेतल्या.

**संबंधित (R)**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत शाळेचा सर्वांगीण विकास होणार असल्याने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत यश मिळवणे ही शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झाली होती.

**वेळेचे बंधन (T)**

शैक्षणिक वर्षाची कालमर्यादा लक्षात घेऊन,गतवर्षी राहून गेलेल्या बाबी विचारात घेऊन त्या साध्य होण्यासाठी वेळेची मर्यादा लक्षात घेण्यात आली. त्यानुसार टीम सदस्यांकडे त्यांच्या क्षमता लक्षात घेऊन कार्याचे वितरण करण्यात आले.वेळेत आवश्यक बाबींची पूर्तता करणे व यश संपादन करणे शक्य होणार होते.राठोड सरांच्या नेतृत्वात शाळेने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक आणि मुंबई विभाग स्तरावर मजल मारून तृतीय क्रमांकाचे रुपये 15 लाख रकमेचे पारितोषिक पटकावले.आता यावर्षी [2025 - 26] शाळा राज्यस्तरावर स्पर्धा जिंकण्यासाठी बेंच मार्क पर्यंत पोहोचण्याची तयारी करीत आहे.श्री राठोड सरांना नाविन्याची व नावीन्यता पूर्ण उपक्रम राबविण्याची आवड आहे.बहुकार्य प्रवणसिलतेचा अवलंब करीत लक्ष्यपूर्ती साध्य करण्याचे आव्हान लक्षात घेऊन,विद्यार्थी, शिक्षक व पालक समाजाचा सहभाग घेऊन सर्वांच्या सहकार्याने शाळेच्या गुणवत्तेसाठी ते कार्य करीत आहेत. त्यांच्या मनात एक स्वप्न आहे. या सर्वांच्या सहकार्यातून एक दिवस 'जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव 'ही "आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा होईल आणि या शाळेत सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण सहज व सुलभ उपलब्ध असेल.या केस स्टडी मधून आपण शिकतो की,स्मार्ट (SMART )आराखडाचा वापर करून आपले ध्येय कसे निश्चित करावे जर माहिती असल्यास कोणतेही ध्येय मग ते कितीही मोठे किंवा लहान असो तरी ते निश्चित करण्यात व साध्य करण्यात यश संपादन होते.

**स्वाध्याय**

**प्रश्न क्र.1 -** मुख्याध्यापकांमध्ये 'स्व- जाणीव 'विकसित झाल्यामुळे काय घडू शकते असे वरील यशोगाथा वाचल्यानंतर आपल्याला वाटते ?

**प्रश्न क्र.2:-** चिंतन आणि स्वीकार ( self reflection and acceptance )यामुळे नेमके काय साध्य होते ?उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

**प्रश्न क्र.3:-** योग्य पर्याय निवडा

• मुख्याध्यापकाने आलेल्या आव्हानांना धैर्याने तोंड दिले कारण -

A. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेचे पारितोषिक मिळवायचे होते
B. सीएसआर द्वारे त्यांच्या शाळेला मदत झाली होती.
C. स्व -विकास व स्मार्ट ध्येये यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता.
D. शाळेची पटसंख्या झपाट्याने वाढत चालली होती ही जमेची बाजू होती.

[महाराष्ट्र शासनाचा एक दर्जेदार अभियान म्हणजे, **मुख्यमंत्री, माझी शाळा सुंदर शाळा** याचा उद्देश विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, शाळांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, स्वच्छता आणि पर्यावरण पूरक वातावरण निर्माण करणे हा आहे.या उपक्रमांतर्गत शाळांचे मूल्यांकन करून पारितोषिक देऊन शाळांना प्रोत्साहित केले जाते. या अभियानामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील शाळांमध्ये पायाभूत सुविधांची सुधारणा,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,अध्ययन अध्यापन प्रक्रिया

सुधारणा होत असून राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवण्यात येत आहे.]

**कार्य योजना** [कार्यवाही योजना सुत्रीकरण ] : –

1. साध्य करावयाचे ध्येय Goal / Aim
2. उद्देश -निश्चित ध्येय किंवा उदिष्ट ( objective )
3. कृती / उपक्रम Activities,
4. कोण कार्य पुर्ण करणार (To whom). म्हणजे someone who has the responsibility to complete a task)

**मी यशस्वी झालो / झाले आहे हे कसे ओळखावे?** [यश मोजणे] -

1. आपल्यातील कौशल्य व ज्ञान जाणून घ्या.
2. आपल्या मधील कमतरता लक्षात घ्या.
3. आपल्या समोरील आव्हाने ओळखा.
4. संधी चा उपयोग करा.

**ध्येय निर्धारणासाठी काय? केव्हा ? कसे? संसाधन कोणती?**

NUEPA [National University of Educational Planning and Administration] New Delhi राष्ट्रीय शैक्षणिक योजना आणि प्रशासन विश्वविद्यालय मार्फत 2014मध्ये प्रकाशित केलेल्या The national curriculum framework मध्ये सांगितलेल्या सहा मुख्य क्षेत्रांपैकी एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून स्व -विकासाचे महत्त्व विशद केले आहे. ज्याद्वारे शाळा प्रमुखांचे व्यवसायिक विकास सक्षम करणे महत्वाचे मानले आहे.यासाठी प्रत्येक शालेय नेतृत्वाला स्व विकास आणि व्यवसायिक विकासाच्या उद्दिष्टांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. शाळेचा नेता म्हणून मुख्याध्यापकांना अनेक कार्य करावी लागतात, सहकारी शिक्षकांसोबत कार्यरत राहून विद्यार्थ्यांना गुणवत्तेत पुढे आणावयाचे असते . प्रत्येक मूल समजून घ्यावे लागते.त्यांच्याकरिता समज पूर्वक शिकण्यासाठी वर्ग रचना करणे, पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करणे, क्रीडांगण,परसबागेकरिता जागा,तंत्रज्ञानाची उपलब्धता, ते वापरणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे लागते. शाळा प्रमुखांकडून' एक सक्षम नेता ' म्हणून समाज अपेक्षा करित असतो. या अपेक्षा पूर्तीसाठी बहूकार्ये प्रवण शिलतेचा अवलंबन करून लक्ष्य पूर्ती करावी लागते.

**नेतृत्व संकल्पना :-**

नेतृत्व हीसंकल्पना खूप व्यापक व मूलगामी आहे. नेतृत्वामध्ये व्यक्तीची दृष्टी आणि अभिव्यक्ती उंचावण्याची त्याच बरोबर व्यक्तिमत्व विकसित करण्याची प्रक्रिया घडत असते.'नेतृत्व' प्रभावी असल्यास प्रगतीचा आलेख उंचावलेला दिसून येतो.` नेतृत्व ` हा आंतरिक गुण असून आंतरिक शिस्त व 'स्व 'ला सर्वार्थाने जाणणे त्यामध्ये अभिप्रेत असते. पुढाकार आणि प्रसंगी धोका पत्करणाची तयारी ठेवून विशिष्ट ध्येय गाठण्यासाठीचे नेत्याकडून कार्य केले जाते. नेतृत्व हे वैयक्तिक आणि व्यावसायिक मूल्यांच्या 'पायावर 'उभे असते आणि ते इतर लोकांच्या ध्येयांना, प्रेरणांना व कृतींना आकार देते.'नेतृत्व 'ही व्यवस्थापन व प्रशासन या दोन संकल्पना सोबत घेऊन जाणारी व त्यात समतोल राखणारी संकल्पना आहे.

**शालेय नेतृत्व -**

जॉन ड्युई यांच्या मते शाळा ही समाजाचे एक लहान रूप असते आणि शाळेतील मुख्याध्यापक त्या समाजाच्या 'नेतृत्व कर्त्याच्या ' / नेत्याच्या भूमिकेत असतो. यासाठी मुख्याध्यापकांना स्वतःचे व्यक्तिमत्व ओळखता आले पाहिजे.त्याचा परिचय (profil )SWOT नुसार असावा. शालेय नेतृत्व म्हणजे अशी प्रभावाची प्रक्रिया असते, ज्यामध्ये अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्याकडे वाटचाल केली जाते. यशस्वी शालेय नेतृत्व आपल्या व्यक्तिगत व व्यावसायिक मूल्यांच्या

मूल्यांच्या द्वारे शाळेसाठी एक भावी दृष्टी विकसित करत असते.प्रभावी नेतृत्व आपली दृष्टी( vision ) इतरांपुढे स्पष्टपणे व प्रभावीपणे मांडून त्याचा प्रभाव आपले सहकारी व इतर संबंधितांचा (stakeholders) सहभाग मिळविते. यामुळे शाळेची तत्वप्रणाली,संरचना आणि कृती त्या सर्वांच्या संघटित दृष्टीच्या (shared - vision) विद्यार्थी संपादणूकीकडे नेते. शालेय शिक्षणामध्ये दर्जा सुधारण्यापासून ते शाश्वत विकासाचे ध्येय क्रमांक 5 [SDG G .5] साध्य करण्यासाठी सहायभूत ठरणारे नेतृत्व म्हणजे शालेय नेतृत्व.

मुख्याध्यापकाला शाळेमध्ये सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, संस्थांचे पदाधिकारी, शासकीय कार्यालय, समाज माध्यमे,समाजातील विविध प्रवृत्तीच्या व्यक्ती अशा अनेक गुंतागुंतीच्या घटकांना एकाच वेळी सामोरे जावे लागते.समाजाकडून शाळेबद्दलच्या अपेक्षा आणि सकारात्मक मानसिकता कायम राखण्याचे मोठे आव्हान पेलताना आपल्या नेतृत्व क्षमतेचा त्यांना कस लावावा लागतो.अभ्यासक्रमातील बदल,वाढलेल्या अपेक्षा, संपादणूक स्तरांमध्ये बदललेली मानके [Benchmarks ]आणि योजनातील मार्गदर्शक तत्त्वे यामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देऊन शाळेचा विकास साधण्यासाठी योग्य दिग्दर्शन व मदत देत शाळा प्रमुख म्हणून 'मुख्याध्यापक ' मार्गक्रमण करत असतात. शालेय वातावरणात तयार होणाऱ्या आव्हानात्मक बाबी नेतृत्वाला अधिक खंबीर बनवतात.म्हणूनच मुख्याध्यापकांचा व्यक्तिमत्व बहूआयामी असणे आणि त्यांच्याकडे नेतृत्व क्षमता असणे ही त्या 'पदाची 'गरज ठरते.

आपण पाहिले की,'नेतृत्व क्षमता ' म्हणजे कौशल्य, प्रेरणा, दृष्टिकोन, वैचारिक,भावनिक, सामाजिक जाणीव, नवनवीन माहिती, ज्ञान अशा वेगवेगळ्या गुणांचा परिपाक आहे.म्हणून मुख्याध्यापकांना आपल्या नेतृत्व क्षमतांचा विकास करण्यासाठी त्यांच्या भूमिका जबाबदाऱ्या याचे सुसंघटन होणे करिता स्वतःला अध्यायावत राहणे आवश्यक आहे. यासाठी स्व -विकासातून नवीन दृष्टी ठेवून स्मार्ट ध्येय निर्धारणातून ते शक्य होणार आहे.शालेय नेतृत्व हे जसे वैचारिक नेतृत्व आहे तसेच ते परिवर्तनाचे प्रेरणास्त्रोत असते.ज्या मुख्याध्यापकांचा दृष्टिकोन सकारात्मक असतो,आव्हानांचे निराकरण करून यश संपादित करण्याचे कौशल्य आत्मसात असते .प्रामाणिकपणाचे मूल्य अंगी असते,अशा मुख्याध्यापकांची आपल्या कार्याबद्दलची दृष्टी (vision) "मला काय करायचे आहे ? माझी भूमिका काय ? मी काय केल्याने काय होणार आहे ? फलनिष्पती काय असणार आहे? मला ध्येय गाठण्यासाठी उद्दिष्ट अनुरूप कोण कोणत्या पर्यायांचा अवलंब करावा लागणार आहे ? याचा विचार त्यात केलेला असतो.यासाठी 'बदलाची तयारी 'नवीन ज्ञान वृद्धींगत करणे स्व - चिंतन, संवाद कौशल्य या बाबी देखील महत्त्वपूर्ण ठरतात Johari window जोहरी विंडो मॉडेल या साधनाचा वापर केल्यास व्यक्तीला आपण 'स्वतः कसे आहोत 'हे समजून घेण्यास मदत मिळते.

**शालेय नेतृत्वाने स्व -विकासासाठी या मोड्यूलचा वापर केल्यास पुढील फायदे मिळणार आहेत.– —**

- स्व जाणीव होणे आणि स्वतःला सुधारण्या करिता.
- वैयक्तिक विकासासाठी.
- शाळेतील इतर व्यक्तींमधील परस्पर सामंजस्य सुधारण्यासाठी.
- इतर लोक आपल्याकडे कसे पाहतात हे समजण्यासाठी.
- संघ विकासाला चालना देण्यासाठी

जोहारी विंडो हे उपयुक्त आणि वापरण्यास सहज सोपे असे (आत्म )स्व - विश्लेषणाचे तंत्र आहे.ते इतर लोकांची मते विचारात घेऊन व्यक्तीला स्वतःची बलस्थाने, कमकुवतपणा, संधी आणि धोके अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी देते.

**शालेय नेतृत्व कौशल्य विकसित होण्यासाठी देश व राज्यपातळीवर झालेले प्रयत्न:-**

मुख्याध्यापकांमध्ये नेतृत्व कौशल्य ( स्कूल लीडरशिप ) विकसित करण्यासाठी भारतात केल्या 10-15 वर्षात केंद्र सरकार,एनसीईआरटी, निपा, एससीआरटी, राज्य शिक्षण विभाग,मिपा आणि विविध प्रशिक्षण संस्था मार्फत मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले आहेत विशेषतः एनसीईआरटी एनआयईपीए आणि एनईपी2020 मुळे या प्रक्रियेला अधिक वेग मिळाला.

**देश पातळीवरील महत्त्वाचे प्रयत्न :-**

★ **National Centre for school leadership (NCSL) :- हे NIEPA अंतर्गत कार्यरत केंद्र आहे.**
**मुख्य उद्दिष्ट :-**

- मुख्याध्यापकांमध्ये नेतृत्व क्षमता विकसित करणे ,
- शाळा व्यवस्थापन कौशल्य
- शैक्षणिक नियोजन
- शिक्षक मार्गदर्शन
- समुदाय सहभाग
- अध्ययन निष्पत्ती संपादनात सुधारणा

**आकडेवारी ncsl dashboard नुसार -**

- **6660** राज्य संसाधन गट सदस्य (S R G) प्रशिक्षित
- **4218** लीडरशिप संसाधन व्यक्ती (L R P) प्रशिक्षित
- **173195 शाळा प्रमुख (स्कूल हेड्स) प्रशिक्षित**
- **29 School Leadership Academics सुरू**
- **115900** ऑनलाइन लीडरशिप प्रोग्राम नोंदणी

★ **निष्ठा प्रोग्राम ( NISHTHA programme 2019 ) :-**

**NCERT** च्या माध्यमातून **NISHTHA** हा जगातील सर्वात मोठा मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम मानला जातो.**(National Initiative for School Heads& Teachers Holistic Advancement.)**

**उदिष्ट:-**

- नेतृत्व कौशल्य
- शाळा परिवर्तन
- भावनिक नेतृत्व
- इंनोवेटिव्ह टीचिंग
- समावेशित शिक्षण
- Competency Based Learning

**NISTHA** अंतर्गत **42** लाख शाळाप्रमुख व शिक्षक प्रशिक्षणाच्या कक्षेत [ITPD NCERT: Report]
**NISTHA 1.0 मध्ये 17, 73, 312** शालेय नेतृत्व प्रशिक्षण पुर्ण
**NCERT** नुसार प्रत्येक शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी दरवर्षी **50** तासांचे **CPD [continuous professional development]** सुचविले आहे.

★ **School Leadership Programme (2014):-**

केंद्र सरकारने 2014 मध्ये राष्ट्रीय स्तरावर मोठा स्कूल लीडरशिप प्रोग्राम सुरू केला. त्याचे उद्दिष्ट देशातील जवळपास 12 लाख शाळांचा मुख्याध्यापकांना नेतृत्व प्रशिक्षण देणे हे होते.

**प्रशिक्षण विषय -**

- शाळा व्यवस्थापन
- शैक्षणिक नेतृत्व
- अध्ययन निष्पत्ती
- टीचर मेंटोरिंग
- डाटाबेस प्लॅनिंग हे होते.

★ **PM SHRI schools Initiative: -**

**Ministry of Education अंतर्गत PM SHRI Schools** मध्ये मुख्याध्यापकांना ट्रान्सफॉर्मशनल लीडर म्हणून विकसित करण्यावर भर दिला जात आहे. 14500 पेक्षा अधिक पीएमश्री शाळा विकसित करण्याचे उद्दिष्ट सुन्या शाळांचे मुख्याध्यापक इतर शाळांसाठी लीडरशिप मॉडेल्स (**Leadership models)** म्हणून विकसित केले जात आहेत.

★ **EMRS Leadership Training :-**

आदिवासी विभागाच्या ईएमआरएस शाळांतील मुख्याध्यापकांसाठी विशेष नेतृत्व प्रशिक्षण. 40 दिवसाच्या निवासी प्रशिक्षणातून 120 मुख्याध्यापक शिक्षक प्रशिक्षित झाले.

**महाराष्ट्र राज्यातील प्रयत्न :-**

1. NEP2020 नंतर शिक्षक व मुख्याध्यापक प्रशिक्षण कालावधी हा शासनाने वार्षिक प्रशिक्षण 30 तासांवरून 50 तास केला आहे.
2. Btended ट्रेनिंग मॉडेल सुरू केले आहे.
3. नेतृत्व,नवोपक्रम आणि शाळा व्यवस्थापनावर भर दिला जात आहे.
4. SCERT,महाराष्ट्र लिडरशिप मॉड्युल अंतर्गत
   - School leadership
   - Academic Monitoring
   - Classroom Observation
   - Community participation
   - Data Based School Improvement या विषयांवर प्रशिक्षण दिले जात आहे.

**इतर राज्यातील प्रेरणादायी प्रयोग -**

a) गुजरात मध्ये 38 535 मुख्याध्यापकांना लीडरशिप ट्रेनिंग
b) राजस्थानमध्ये 839 शाळा **Centres of Excellence** ठरल्या.

**नेतृत्व विकासात विकसित होणारी मुख्य कौशल्य**

मुख्याध्यापक प्रशिक्षणात खालील कौशल्यांवर विशेष भर दिला जात आहे –

| नेतृत्व कौशल्य | उद्दिष्ट |
| --- | --- |
| 1. Visionary leadership | 1. शाळेचे दीर्घकालीन नियोजन |
| 2. Instructional leadership | 2. अध्यापन गुणवत्तेत सुधारणा |
| 3. Emotional intelligence | 3. शिक्षक विद्यार्थी संवाद |
| 4. Team building | 4. शिक्षक संघटन |

5. Data based decision making
6. Community leadership
7. Community leadership

5. निकाल व उपस्थिती विश्लेषण
6. पालक व ग्राम सहभाग
7. नवीन उपक्रम राबविणे

## केस स्टडी -3

### शाळेचे नाव:- लायन एम पी भूता सायन सार्वजनिक स्कूल,धारावी ,(URC -2,सायन), मुंबई

### मुख्याध्यापकाचे नाव:- श्री. जगदीश इंदलकर

**शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा** अंतर्गत बाह्य मूल्यांकनात श्रेणी शाळेला मिळवून देण्यात आणि शिक्षणातील परिवर्तनशील नेतृत्व करणारे श्री.जगदीश इंदलकर या मुख्याध्यापकाचा प्रेरणादायी प्रवास नक्की च प्रेरित करणारा ठरतो - मुंबईतील लायन एमपी भूता सार्वजनिक स्कूलचे 'मुख्याध्यापक 'म्हणून त्यांच्या समर्पणातून आणि सकारात्मक दृष्टिकोनातून शाळेच्या पायाभूत सुविधा, वर्गातील अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि समुदाय सहभाग या सर्व बाबींमध्ये उल्लेखनीय परिवर्तन दिसून येत आहे.

हे परिवर्तन होणे एवढे सोपे कधीच नव्हते. अनेक आव्हानांवर मात करताना राबविण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयाची फलश्रुतींचा परिणाम म्हणजे शाळेचे आजचे यश.हे एक **परिवर्तनात्मक शालेय नेतृत्वाचे** उदाहरण ठरेल.विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबविलेले प्रत्येक उपक्रम,तयार केलेले मार्गदर्शक साहित्य आणि केलेली संशोधनात्मक कामगिरी याची फलश्रुती म्हणजे मुख्याध्यापक श्री इंदलकर सरांना मिळालेला "**क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार 2025**"होय.

लायन एम.पी. भूता, सायन सार्वजनिक स्कूल ही (1956) गुजराती व इंग्रजी माध्यमाची असून या शाळे मध्ये धारावीसारख्या परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील पहिल्या पिढीतील शिकणारे विद्यार्थी बहुसंख्या आहेत. जेव्हा श्री. इंदलकर सर 'मुख्याध्यापक' या पदावर आले तेव्हा शाळेचा पट अतिशय कमी होता आज जरी शाळेचा पट 700 आहे तरी,सरकारी भरतीवरील निर्बंधामुळे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कमतरताआहे. तसेच शाळेत डिजिटल वर्ग खोल्या, विज्ञान प्रयोगशाळा,क्रीडा सुविधा अशा अनेक बाबी यापूर्वी नव्हत्या. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य आणि समुपदेशन सेवा उपलब्ध नव्हते. पालकांची उदासीनता,विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास करण्याची प्रेरणा कमी, गैरहजेरीचे प्रमाण जास्त,अशा अनेक समस्या /आव्हाने त्यांच्या समोर होती.

अशा या आव्हानांना तोंड देत मुख्याध्यापक सरांना संस्थेमध्ये सुरू असलेल्या स्पर्धांशी संघर्ष करावा लागला होता.शाळेत एक वेगळीच प्रतिष्ठा विकसित झालेली होती. सरांना मिळणारे सहकार्य मर्यादित होते.स्वतःचे नवोपक्रम राबवताना देखील मुख्याध्यापक सरांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.पण धैर्याने असलेल्या परिस्थितीला स्वीकारून, येणारे आव्हाने, अडचणी ओळखून स्वतः वर लक्ष दिले.सतत शिकणे, नवीन बाबी समजून घेणे,कुतहल आणि प्रयत्नाने स्वतःच्या क्षमता वृद्धिंगत करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. स्वतः अनेक बाबींचा अभ्यास करत शाळेत' नवोन्मेष 'घडवून आणला.सर्जनशील,काहीतरी नवीन निर्माण करण्याचा प्रक्रियेला सुरुवात केली.यासाठी सर्वप्रथम श्री इंदलकर सरांनी **SWOT** विश्लेषण करून आपल्या शाळेसाठी क्षमता,कमतरता, संधी आणि धोके लक्षात घेतले.






**S -** शाळेची ताकद ओळखताना त्यांच्या लक्षात आले की आपली संस्था 72 वर्ष जुनी आहे. इंग्रजी आणि गुजराती माध्यमाची ही शाळा आहे.शाळेला शासकीय अनुदान प्राप्त आहे.पात्र अध्यापन करणारे शिक्षक आहेत.
**W -** शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.कोविड नंतर शाळेत विद्यार्थी येण्याचे प्रमाण खूप कमी झाले, शैक्षणिक उपक्रमात सहभाग घेण्यामध्ये पालकाची उदासीनता प्रकर्षाने जाणवत होती. शालेय भौतिक सुविधांची कमतरता होती.
**O -** मुख्याध्यापकांना जाणवले की,पायाभूत सुविधा व कौशल्य विकासासाठी सीएसआर चे माध्यम निवडणे शक्य होते.त्यातून विविध उपक्रम राबविणे शक्य होणार होती.मेंदू आधारित कृती ( Brain based ), कृतीआधारित ( activity based)अध्ययन अध्यापन प्रक्रिया घडविणे शक्य होते. व्यवसायिक अध्ययन अध्यापन सुरू करणे शक्य होणार होते.
**T -** विद्यार्थ्यांच्या कुटुंबांमधील आर्थिक अस्थिरतामुळे शालेय उपक्रमामध्ये विद्यार्थी सहभागाचे प्रमाण किती वाढेल शंका होती. विद्यार्थ्यांची व्यवसायिक उपक्रमांमध्ये सहभागाची शाश्वती नव्हती. परिसरातील खाजगी शाळांकडून वाढती स्पर्धा हा देखील एक मोठा धोका होता.
शाळेचे मुख्याध्यापक म्हणून श्री इंदलकर सरांनी धोरणात्मक निर्णय घेऊन शाळेचे रूप बदलविण्याचा निर्धार पक्का केला.यासाठी आपल्या दूरदृष्टी पूर्ण नेतृत्वाद्वारे शाळेचे रूप बदलणारे vision तयार केले.
**VISION —>> शिक्षण+कौशल्य +अनुभव = जीवनदायी शिक्षण**

**SMART** ध्येय तयार करताना, अचूक फलनिष्पती प्राप्तीसाठी शालेय नेत्याने आपल्या **प्रभावी संवाद कौशल्यांचा** आधार घेतला.शाळेतील सहकारी शिक्षकांची **संघ बांधणी** करण्यावर आणि **CSR** मिळविण्यावर लक्ष केंद्रित केले.,विविध प्रशिक्षण वर्गातून आणि स्व विकासाचे कोर्स पूर्ण करून स्वतः मधली प्रगल्भता त्यांनी वृद्धिगंत करण्यास सुरुवात केली. सामाजिक स्व - जाणीवेचे महत्व त्यांनी ओळखले. आवश्यक ते स्वतः मध्ये बदल करित चिंतनातून धोरणात्मक निदान करित संघटनात्मक तयार भागधारकांचे संरेखन,संवाद आणि संवेदना निर्मिती आणि एम्बेडिग, नूतनीकरण या टप्पाच्या आधारे आपल्या शाळेचे परिवर्तन घडविले. आपल्या

सहकाऱ्यांमध्ये संघ भावना आणि सुविधा देणारा ( सुलभक) च्या भूमिकेचे महत्व रुजविण्यात यश मिळवले.




Principal Jagdish Indalkar (left) with students preparing scented soaps for Umang at Lion MP Bhuta School, Sion.

CSR च्या माध्यमातून आलेला निधीद्वारे शैक्षणिक साहित्य खरेदी करता आली,विज्ञान प्रयोगशाळा,ई - लायब्ररी सुरू केली.रोबोटिक्स व STEM लॅब उभारण्यात आली.शाळेत शास्त्रीय संगीत, स्वरधारा प्रकल्प,धनुर्विद्या,रायफल शूटिंग, बुद्धिबळ, तायक्वांदो इत्यादी विविध क्रीडा व मैदानी खेळ आता खेळण्यात येऊ लागले. परिणामी शाळेत उपस्थित राहण्याच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले.पालकांचा अभूतपूर्व सहभाग मिळू लागला.

**शिक्षणातून अर्थार्जनाकडे नेणारा उपक्रम 'उमंग कार्यक्रम'**'सुरू करण्यात आला.या उपक्रमामध्ये स्टार्टअप स्किल वृद्धीकरण करण्याची संकल्पना आहे. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्यातून रोजगाराची दिशा देणारा हा उपक्रम प्रभावीपणे दरवर्षी राबविला जात आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देखील स्व -विकासाचे पैलू दिसतात. जसे निरीक्षण शक्ती,संघभावना, अभिव्यक्ती कौशल्य,आणि सर्जनशील विचारसरणी प्रकर्षाने दिसून येऊ लागली.मागील चार वर्षात जवळपास सीएसआर मधून दीड कोटी चे लक्ष्य ठेवले.

आता पर्यंतच्या प्राप्त CSR मधील लाभाबरोबर 2026 मध्ये **SBI capital markets Ltd.** च्या उदार CSR पाठिंब्यामुळे लायन एम. पी. भूता शाळेच्या विकासासाठीचे परिवर्तन हे "**सोनेरी अक्षरात**'' लिहिण्या योग्य झाले असे मुख्याध्यापक मानतात. हा त्यांच्यासाठी ऐतिहासिक बदल ठरत आहे.एसबीआय कॅपिटल स्टुडइसी भारत फाउंडेशनचे ते मोठ्या आनंदाने आभार मानतात.मुख्याध्यापकांच्या मते CSR मुळे शाळेच्या विकासाच्या आणि उत्कृष्टतेच्या प्रवासातील एक मोठी झेप घेता आली.

एक आधुनिक पूर्णपणे सुसज्ज अशी शाळा पूर्ण करण्यासाठी चे प्रोजेक्ट मूल्य ( Value ) हे एसबीआयकडून रुपये **40 लाख** रक्कमेचे होते.हे केवळ पायाभूत सुविधांचे अद्ययावतीकरण नसून NEP 2020 च्या दूरदृष्टीशी सुसंगत,भविष्यासाठी सज्ज, अनुभवात्मक आणि आनंददायी शिक्षणाच्या दिशेने होणारे परिवर्तन आहे. आज शाळेत सुसज्य विज्ञान लॅब,डिजिटल सक्षम स्टाफ रूम,आधुनिक पायाभूत सुविधा, 12 डिजिटल पॅनल बोर्ड,सायन्स ईक्रुप्मेंट[science equipment )आहेत.

उमंग सारखा हाताला काम देणारा उपक्रम सुरू आहे. मिळविलेल्या CSR चा लाभ विद्यार्थ्यांना गुणवत्तेसाठी वापरत,’**'शाळा ही केवळ शिकण्याची नव्हे तर, घडविण्याची पवित्र जागा** “असल्याचे दाखवून देणारे श्री इंदलकर सरांनी निश्चित केलेल्या चार वर्षातील ‘ **स्मार्ट ध्येय** ‘ पुढीलप्रमाणे होती.

1. शैक्षणिक वर्ष 2022- 23 करिता 25 % नी सीएसआर मिळवून शाळेत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.
2. गतवर्षीचा तुलनेत CSR मध्ये 15 % ने वृद्धी करून शैक्षणिक वर्ष 2023 -24 मध्ये शैक्षणिक उपक्रमास सुरूवात करणे.
3. शैक्षणिक वर्ष 2024.- 25 करिता 25% CSR मध्ये वृद्धी करणे.
4. सन 2025 -26 या शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत शाळेसाठी गतवर्षीच्या तुलनेत 10% वाढीने सीएसआर मिळवून शाळा अपग्रेड करणे.

**SMART ध्येया मध्ये त्यांनी लक्षात घेतले की -**

**विशिष्ट (S ) :-** शाश्वत विकास घडवून शाळेचा गुणवत्ता वृद्धीसाठी (CSR ) कॉपोरेट सामाजिक जबाबदारी मधून शाळा सुधार कामात उन्नत मार्गाने लाभ करून घेणे साठी **CSR अनिवार्य करणारा भारत हा पहिला देश आहे**.

**मोजण्या योग्य (M)** :- शाळेच्या यशाचे मोजमाप **A** +आहे.

**साध्य करण्या योग्य ( A )** :- मुख्याध्यापक म्हणून श्री. इंदलकरसरांना विश्वास आहे की, स्व-जाणीव झाल्याने स्वतःला ओळखून पुरेसा प्रयत्नाने आणि **SWOT** विश्लेषणाद्वारे संवाद कौशल्याचा उपयोग करून CSR च्या माध्यमातून शैक्षणिक गुणवतेची वृद्धी होणे शक्य आहे.

**संबंधित ( R )** :- शाळा गुणवत्ता मूल्यांकनात “**A+**” **श्रेणी** मिळवण्याचे ध्येय, सीएसआर वाढीच्या ध्येयाशी संबंधित आहे

**कालमर्यादित ( T ) :-** श्री.इंदलकर सरांनी स्वतःच्या ध्येयपूर्तीसाठी, स्वतःला जबाबदार ठेवण्यासाठी,कराव्या लागणाऱ्या सर्व आवश्यक बाबीं करिता वेळ निश्चित केलेली आहे. तसेच ती काल मर्यादा वास्तववादी ठरेल याची खात्री बाळगली आहे.

या केस स्टडीच्या अभ्यासातून आपल्या हे लक्षात येते की**,‘यशस्वी परिवर्तन,** ‘हे केवळ संरचनात्मक बदलामुळे घडत नसते तर ते धोरणात्मक निर्णय,नेतृत्व वर्तन,संघटन,कार्यप्रवणकता यांच्यातील परस्पर संवादातून उदयास येते.म्हणून शालेय नेतृत्वाने धोरणात्मक स्पष्टता प्रदान केली पाहिजे. सहकार्य करणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. जेणे करून त्यांना परिवर्तनाचा उद्देश आणि दिशा समजते आणि यामुळे बदलाच्या उपक्रमांना पाठिंबा देण्याची शक्यता जास्त निर्माण होते.

**[धोरणात्मक निर्णय म्हणजे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वोत्तम मार्ग निवडणे होय. यश साध्य करण्यासाठी ध्येय (Mission) दृष्टी (Vision) आणि स्पर्धेतील स्थान (Competitive position) या तीन बाबी महत्त्वपूर्ण ठरतात.**




2022-23 - ₹ 4,685,000
2023-24 - ₹ 2,484,625
2024-25 - ₹ 3,810,285
2025-26 - ₹ 6,253,001

**चिंतनात्मक प्रश्न :-**

**परिवर्तनशील नेत्यांनी पुढील प्रश्नावर चिंतन केले पाहिजे.**

1. परिवर्तनाची गरज निर्माण करणारे बाह्य घटक कोणते ?आपल्या सहकाऱ्यांना 'बदलांचा धोरणात्मक उद्देश 'समजत नसल्यास कोणती रणनीती आखावी ?

2. परिवर्तनाला पाठिंबा देण्यासाठी कोणत्या शालेय घटकांना सहभागी करून घेतले पाहिजे ? त्यांचे महत्व अधोरेखित करा.

**योग्य पर्याय निवडा.**

**A. शालेय नेतृत्वाने यशस्वी परिवर्तनासाठी हे करावे - -**

1. शाळेत फक्त सरंचनात्मक बदल घडवून आणावे.
2. सहकाऱ्यां मध्ये धोरणात्मक स्पष्टता प्रदान करावी.
3. शाळा गुणवता मूल्यांकनात A+ श्रेणीत आणाव्या.
4. स्वतःला वाटतील ते निर्णय घ्यावेत .

**B. गतवर्षीच्या तुलनेत 2025 - 26 साठी एम पी भूत्ता शाळेच्या मुख्याध्यापकाने स्मार्ट ध्येय निश्चित केली आहेत -**

1. 25% सीएसआर मध्ये वृद्धी करणे
2. 15% सीएसआर मध्ये वृद्धी करणे
3. 30 % सीएसआरमध्ये वृद्धी करणे
4. 10 % सीएसआरमध्ये वृद्धी करणे

**आता आपण मुंबई महानगर पालिका शाळेतील एका नवोपक्रमशील मुख्याध्यापकाची यशोगाथा अभ्यासू –**

## केस स्टडी – 4

**शाळेचे नावः- कलेक्टर कॉलनी मनपा उच्च प्राथमिक हिंदी शाळा,चेंबूर (URC -4 चेंबूर ),मुंबई**

**मुख्याध्यापकाचे नावः- श्रीम. शुभांगी नंदकुमार जाधव**

शिक्षक म्हणून आपल्याला एक पिढी घडवायची असते. आपणच घडून नाही चालत याचे भान राखत, संघर्षमय जीवनात उभे राहण्याचा 'आत्मविश्वास 'प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये रुजला पाहिजे हे ध्येय ठेवणाऱ्या श्रीम . शुभांगी नंदकुमार जाधव ह्या मुंबई मधील पश्चिम भागातील (मुंबई पब्लिक स्कूल) कलेक्टर कॉलनी मनपा उच्च प्राथमिक हिंदी शाळा चेंबूर, शाळेच्या मुख्याध्यापक आहेत. 1994 ला D.Ed. शिक्षण होऊन शिक्षिका झालेल्या जाधव मॅडम या शाळेत 2019 पासून अध्यापनाचे काम करतात. 1+ 5 = 06 शिक्षक या शाळेत कार्यरत आहेत आणि शाळेचा पट 313आहे. शैक्षणिक कार्य आणि समाजकार्याची आवड असल्यामुळे जाधव मॅडमनी स्वतः चे शिक्षण बीए.बी.एड.केल्यानंतरही आपण कोठेही कमी पडू नये,सर्व कायदे, नियम याची माहिती असावी म्हणून पुढे LL.B.चे शिक्षण पूर्ण केले.शुभांगी जाधव ह्या 'कोविड योद्धा 'सन्मानित मुख्याध्यापक आहेत.त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या शाळेला **मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -2 स्पर्धेत ( 2024 - 25 )-बृहन्मुंबई जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळून रुपये 21 लाख रकमेचे पारितोषिक प्राप्त झाले.** या घवघवीत यशाचे श्रेय हे श्रीम.जाधव मॅडम यांच्या कार्यप्रवणता, बुद्धीमत्ता, संवाद कौशल्य, राबवलेले नवनवीन उपक्रम यामध्ये दडलेले आहे.या यशात त्यांना साथ दिली ती त्यांच्या सहकारी शिक्षकांनी, विद्यार्थी,पालक,अधिकारी आणि समाजातील सेवाभावी नामवंतानी. 313 पट असलेल्या चेंबूरमधील या शाळेत (1 + 5 = 6) सहा जणांचा स्टाफ कार्यरत आहे. आपल्या सहकारी शिक्षकांच्या मदतीने शाळेला स्वच्छ विद्यालय पुरस्कार, पथनाटय तृतीय क्रमांक - (2024 - 25) शाळेची परसबाग या उपक्रमात पहिला क्रमांक असे यश प्राप्त करून दिलेआहे.प्रचंड वाचनाची आवड असणाऱ्या व ती जोपासणाऱ्या श्रीम.जाधव मॅडम यांना 'उत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्कार 'आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार (2024 - 25) अशा अनेक पुरस्कारांने गौरविण्यात आले आहे. त्याच्या त्या मानकरी ठरलेल्या आहेत.







या शालेय नेत्याला सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यांनी अनेक सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. सामाजिक कार्याची आवड आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्या जोपासतात.शून्य विद्यार्थी गळती असलेल्या,आपल्या शाळेत लांयन्स क्लब यांच्यामार्फत विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करून लाभार्थी विद्यार्थ्यांना चष्मा वितरित केले आहेत .माऊली फाउंडेशन मुंबई व ग्रीन मोझ फाउंडेशन मार्फत फलटणमध्ये जाऊन वारीमध्ये मेडिकल कॅम्प चालविलेले आहेत. अन्नदान करणे व इतर सेवा कार्य त्यांनी केलेली आहेत.राज्य रक्त संक्रमण परिषद करिता स्वतः रक्तदान करतात.ग्रीन मोझ फाउंडेशनच्या सहकार्याने शाळेत' योग शिकवला जातो.'स्वतःजाधव मॅडम यांनी कामा रुग्णालय मुंबईच्या वतीने आयोजित योग,मेडिटेशन आणि पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट चे प्रशिक्षण घेऊन स्वतःला अपडेट ठेवले आहे. आपली वाचनाची आवड जोपासताना अनेक ठिकाणी लोकांमध्ये''वाचनाची आवड ''निर्माण होण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले आहेत. जसे, कुसुमाग्रज ग्रंथ आपल्या दारी . मासिक - पुस्तक पेटी इत्यादी वाचनाबरोबर विद्यार्थांमध्ये ''खेळाची आवड निर्माण व्हावी, ''यासाठी त्या दक्ष आहेत. विद्यार्थ्यांना खेळासंबंधी साहित्य पुरवून त्यांना खेळाचे योग्य प्रशिक्षण उपलब्ध करून दिले आहे. परिणामी बॉक्सिंग सारख्या खेळात शाळेचे विद्यार्थी देशपातळीवर अव्वल ठरले आहेत. तायक्वांदोमध्ये विद्यार्थी आघाडीवर आहे.

फुटबॉल मध्ये विद्यार्थी प्रथम क्रमांकावर विजेते आहेत.अशा या शाळा नेतृत्वाचे एक **नाविन्यपूर्ण उपक्रमाचे SMART ध्येय अभ्यास** - -

शुभांगी जाधव मॅडम यांनी आपल्या शाळेत एक नाविन्यपूर्ण ''**मायक्रोग्रीन द्वारे पौष्टिक आहार**''उपक्रम गेल्या वर्षापासून राबविण्यास सुरुवात केला.त्यासाठी त्यांनी SMART ध्येय विचारात घेतली.यावर्षी त्यांचे ध्येय होते - **''शैक्षणिक वर्ष 2026 अखेर अंकुरण प्रक्रिया लागवडी मधून ( हायड्रोपोनिक शेती )शाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांना मायक्रोग्रीन सॅलेड हा पोष्टिक नाश्ता पुरविण्यामध्ये 10% ने वाढ करणे. ''** या मध्ये–

**विशिष्ठ (S) :** मनपा उच्च प्राथमिक हिंदी शाळेत येणारे विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत असलेल्या कुटुंबामधून येतात. आहार व्यवस्थित नसल्याने त्यांचे अभ्यासात लक्ष राहत नाही करिता अशा सर्व विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार पुरवणे हे त्यांचे ध्येय आहे.

**मोजण्या योग्य (M) :** सर्व विद्यार्थ्यांना सॅलेड मध्यम पौष्टिक आहार पुरवणे हे जरी ध्येय असले तरी किती विद्यार्थी शाळेत पौष्टीक आहार म्हणून तृण असलेले (मायक्रोग्रीन सॅलेड) सॅलेड नाश्तामध्ये आवडीने खातात ? किती जण सैलेड खात नाही ? सॅलेड खाणाऱ्यामध्ये कोणत्या कडधान्याचे तृण,कोणत्या भाजीचे तृण आवडीने खाल्ले जाते, याची नोंद घेऊन, संबंधित बाबींमध्ये वाढ करून होणाऱ्या प्रगतीची नोंद श्रीमती जाधव मॅडम आपल्या डायरीत घेतात.वैद्यकीय टीमच्या साह्याने विद्यार्थ्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिन वाढीचे प्रमाण लक्षात घेतल्याने मायक्रोग्रीन सॅलेडचे नाश्त्यामधील प्रमाण ठरवणे मॅडम यांना शक्य झाले.

**साध्य करण्यायोग्य (A) :** जाधव मॅडम शाळेचा मुख्याध्यापक म्हणून शाळेची धुरा कौशल्याने सांभाळून काही कालावधी हा या उपक्रमाची पूर्तता करण्यासाठी राखून ठेवतात.छोट्या प्रमाणात हायड्रोपोनिक शेतीची लागवड शाळेच्या वर्ग खोल्यात करणे शक्य होते याची त्यांना माहिती आहे.त्यांच्या अनुपस्थितीत ‘ अंकुरण प्रक्रियेची देखभाल “करण्यासाठी त्या सहकारी शिक्षक आणि वरच्या वर्गातील म्हणजे इयत्ता सातवी ते आठवीच्या विद्यार्थी यांची मदत देखील उपलब्ध करून घेतात. तसे त्यांचे नियोजन करतात.

**संबंधित (R) :** अंकुरित धान्याच्या तृण सेवनाने विद्यार्थ्यांना पोष्टिक आहार मिळतो. प्रथिने,जीवनसत्त्वे,खनिजे, तंतुमय आहार प्रभावीपणे विद्यार्थ्यांच्या शरीराला उपयुक्त ठरणार आहे. मायक्रो ग्रीन सॅलेड मुळे अँटी-ऑक्सिडटंस मोठ्या प्रमाणात मिळणार आहे.मनपा शाळेत पाठवणाऱ्या आहारासोबत हे सॅलड दिल्याने पौष्टिकता वाढत आहे. श्रीम.जाधव मॅडम यांना या सर्व प्रक्रियेमध्ये लागणाऱ्या आवश्यक साधन सुविधा सहजपणे उपलब्ध झालेल्या आहेत.

**काल मर्यादा (T) :** शाळेच्या शैक्षणिक वर्षात हा उपक्रम राबविणे शक्य झाले.कामाचे नियोजन करून सुट्टीच्या दिवसांचे वेळापत्रकानुसार नियोजन करून दररोज “मायक्रोग्रीन “च्या वाढीवर लक्ष ठेवणेही सहज शक्य झाले आहे.पहिल्या सत्रातील व दुसऱ्या सत्रातील शाळेचे दिवस लक्षात घेऊन या उपक्रमाची वेळ ठरविण्यात आलेली आहे.





श्रीमती जाधव मॅडम यांनी स्वतःच्या निगराणीमध्ये सन -2024 - 25 पासून सुरू केलेल्या या उपक्रमातून पौष्टिक आहार आपल्या विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी ‘अंकुरण प्रक्रिया लागवडीतून ‘येणाऱ्या तृणाचे (microgreens) सॅलेड विद्यार्थ्यांच्या शाळेतील नाश्त्या सोबत देऊन प्रथिने, जीवनसत्वे, खनिजे, तंतुमय घटक मिळतील यावर काम केले.त्यासाठी विविध कडधान्य जसे, मटकी, मूग,सूर्यफूल,हरभरा,आणि मेथी, पालक,कोथिंबीर भाज्यांची लागवड करण्यासाठी त्यांच्या बिया उपलब्ध करून घेतल्या तसेच बियांचे अंकुरित तृण निर्माण होण्यासाठी योग्य पानाचा वापर, सूर्यप्रकाश, पाण्याचा निचरा होणारे मोठे ट्रे,कोको, फ्लोरो सेंट दिवे उपलब्ध करून घेतली. बुरशी, माश्या, चिलट येवू नये म्हणून आवश्यक ती काळजी घेतली. गतवर्षी अंकुरित तृण कापणी करून स्वच्छ करण्याची जिम्मेदारी शिक्षकांच्या निगरानी खाली इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांवर सोपवली होती. विद्यार्थ्यांना देत असलेल्या

या पौष्टिक नाश्त्यातून विद्यार्थ्यांमध्ये खरंच काही परिणाम होत आहे का ? याची तपासणी मनपा वैद्यकीय टीम च्या साह्याने केलीअसता,त्यांना असे आढळून आले की,मायक्रोग्रीन सॅलेड घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पोषण मूल्यात वाढ होऊन विद्यार्थ्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढीस मदत झाली आहे.हे निरीक्षण व निष्कर्ष गतवर्षी शाळा सुरू झाल्यावर इयत्ता आठवीच्या रोज सॅलड खाणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रारंभीच्या वैद्यकीय तपासणी आणि अंकुरित तृण सॅलेड म्हणून नाश्त्यात खाण्यास सुरू केल्यानंतर, म्हणजे उन्हाळी सुट्टी लागण्या अगोदर झालेल्या वैद्यकीय तपासणी मधील आलेल्या रिपोर्टनुसार होते. परंतु गत वर्षी मायक्रोग्रीन सॅलेड खाण्यास पसंती देणाऱ्या विद्यार्थी यांचे प्रमाण तुलनेने न खाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणापेक्षा कमी होते.या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन श्रीमती जाधव मॅडम यांनी शैक्षणिक वर्ष 2025 -26 साठी देखील हा उपक्रम परत सुरू ठेवला.त्या या उपक्रमाचे महत्व सांगताना त्या म्हणतात,'विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी पोषक तत्वांचे सेवन होणे जसे,प्रथिने जीवनसत्वे, अँटिऑक्सिडंटस आणि खनिजेसारखे पोषक तत्व अन्नद्वारे मिळावे यासाठी हायड्रोपोनिक शेतीची संकल्पना लक्षात घेऊन त्याचे महत्व ओळखून नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू ठेवणे माझ्यासाठी प्राधान्याचे कार्य आहे.गत वर्षाप्रमाणे आवश्यक साधनसुविधा उपलब्ध करून योग्य निगरानी खाली नाश्ता देण्यास सुरुवात केलीआहे.

तृण कच्चे खाल्ले जात असल्याने त्याचे मूठभर प्रमाण ठरवून दिले. तसेच हानिकारक जीवाणू टाळण्यासाठी व्यवस्थितरित्या तृण स्वच्छ करण्या वर लक्ष दिले. यावर्षी इ. 6 वी ते इ.8 वी च्या विद्यार्थांनी सॅलेड मनापासून खाण्यास सुरवात केली. विशेषतः मटकी, पालक, कोथिंबीर,मेथी, मूग यांच्या तृणाला पसंती क्रम जास्त होता. यावर्षी जाधव मॅडमनी ' गहू ' देखील यामध्ये समाविष्ट केले. त्यांचे असे लक्षात आले की पहिल्या सत्रात 40% विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीच्या तीन महिन्यात मायक्रो ग्रीन सॅलेड नाश्त्यामध्ये ठेवण्यास पसंती दर्शवली. म्हणून पालकसभेत प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकाची त्यांनी संवाद साधला आणि आहाराचे महत्व समजावून सांगण्यामध्ये त्यांना यश आले. पालकांना घरातून कडधान्य पाठवण्याविषयी विनंती देखील करण्यात आली.पहिल्या सत्राच्या शेवटपर्यंत एकूण 313 विद्यार्थ्यांपैकी रोज उपस्थित राहणारे सरासरी 223 विद्यार्थी दररोज मायक्रोग्रीन सॅलेड नाष्ट्यामध्ये घेऊन आवडीने खात आहेत असे निदर्शनास आले अजूनही 30% विद्यार्थी सलेड खाण्यास नापसंती दर्शवित होते हे शुभांगी जाधव मॅडम यांच्या लक्षात आल्याने या शालेय नेतृत्वाने अशा सॅलेड न खाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क पुन्हा केला, संवाद साधून पौष्टिक आहाराचे महत्व पटवून दिले. माहे फेब्रुवारी 2026 पर्यंत हा नाश्ता आवडीने खाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शनीय रित्या वाढली. आता 253 विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले आहेत.मायक्रोग्रीन सॅलेड आवडीने खात आहेत,काही विद्यार्थी सुट्टीच्या दिवसात शाळेत येऊन घरच्यांसाठी देखील तृण घेऊन जात आहेत व अंकुरित धान्याची योग्य ती काळजी देखील घेत आहेत.इयत्ता पहिली व दुसरीच्या काही विद्यार्थ्यांना अजूनहीतृणाचे सॅलेड खाण्यात नापसंती आहे. यावर काही आणखीन उपाययोजना करता येईल का या दृष्टीने शुभांगी जाधव मॅडम चिंतन करीत आहे. या उपक्रमासाठी अजून दहा टक्क्याने वाढ होणे त्यांना अपेक्षित आहे. या केस स्टडी मधून लक्षात येते की शालेय नेतृत्वाने सामाजिक भान ठेवून प्रामाणिकपणे कार्याचे व्यवस्थापन केल्यास रुपये 21 लाख रकमेचे मोठे पारितोषिकही मिळू शकतात, तसेच अधिकारी वर्गाकडून शाबासकीची पावती मिळते,त्याशिवाय समाज सहभाग, पालकांशी संवाद,त्यांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साध्य करण्यास सहजता प्राप्त होते. मात्र यासाठी शालेय नेत्यास खऱ्या अर्थाने शाळेचे उत्तरदायित्व स्वीकारावे लागते.

**Reference Links :**

https://youtube.com/shorts/vL2slW-JfME?si=Fp31Py2c8nDlNqSn

https://youtube.com/shorts/Dqdh62_A9T8?si=5lZebwS52cPZcq7t

**प्रश्न 1 :-** शाळेचा मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पूर्ण करताना श्रीं. कल्पना जाधव यांच्या कोणत्या कृतीमुळे शालेय परिवर्तनास हातभार लागला ?

**प्रश्न 2 :-** तुम्हाला सुचणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे ध्येय निश्चित करून तो उपक्रम शाळेत कसा राबवणार यासाठी ते रुब्रिक्स तयार करा.

**प्रश्न 3 :-** अचूक पर्याय निवडा

**१)** मुख्याध्यापकाने केलेल्या कोणत्या उपाययोजनेमुळे 'तृणाचे सॅलेड ' आहारात घेण्यास विद्यार्थी तयार झाले -

a) आहाराविषयी पालकांशी संवाद केल्याने

b) शाळेसाठी CSRमिळवून भौतिक सुविधा केल्याने

c) विद्यार्थ्यांचे रोज कौतुक केल्याने

d) उपक्रम राबविण्या विषयी वर्गशिक्षकांना ताकीद दिल्याने

2**) मायक्रो ग्रीन सॅलेड खाल्ल्याने काय होईल?**

a ) पोषणमूल्यात वाढ होऊन विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारेल.

b) हायड्रोपोनिक शेतीचे महत्व समजेल

c) फक्त पर्याय ( a ) बरोबर उत्तर

(d) पर्याय ( a ) व ( b ) दोन्ही बरोबर

[हायड्रोपोनिक शेती संकल्पना म्हणजे मातीशिवाय लागवड करण्याचीअशी एक पद्धत यासाठी पाणी, ट्रे, सूर्यप्रकाश आवश्यक असतो. मायक्रोग्रीन्स (Microgreens) म्हणजे बियांचे उगवण झाल्यावर 5 ते 21 दिवसाच्या आत तोडण्यास योग्य कोवळी पानं,यात एक देठ,एका पेक्षा अधिक बीजपत्री आणि दोन कोवळी पाने असतात.]

आतापर्यंत आपण शालेय नेतृत्वासाठी स्व -विकास आणि SMART ध्येय याचे महत्व लक्षात घेतले. शालेय नेतृत्व वृद्धी साठी केंद्र शासन व राज्यशासन यांचे विविध उपक्रम अभ्यासले आहे. अनेक प्रशिक्षण घेवून जरी झाली तरी, अनेक मुख्याध्यापकांना एक शालेय नेता म्हणून अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

## मुख्याध्यापकांच्या समोरील प्रमुख आव्हाने –

शैक्षणिक व्यवस्थेमध्ये मुख्याध्यापक हे केवळ प्रशासकीय अधिकारी नसून शैक्षणिक नेता [ Instructional Leader] म्हणून कार्य करतात. त्यामुळे त्यांच्या समोर शैक्षणिक, प्रशासकीय,तांत्रिक, सामाजिक आणि मानसिक अशा विविध प्रकारचे आव्हाने निर्माण झालेली दिसून येतात.

**1) शैक्षणिक गुणवत्तेचे आव्हान -**

**समस्या** -

- विद्यार्थ्यांचे लर्निंग आऊट कमी असणे.
- वाचन,लेखन,गणितातील मूलभूत कौशल्यांमध्ये कमतरता
- Competency Based Education लागू करण्यामधील अडचणी
- विविध स्तरातील विद्यार्थ्यांना समान गतीने शिकवणे कठीण जाणे.

**परिणाम -** निकालावर दबाव

- NAS,SAS,PARAKH यासारख्या मूल्यांकनात कमी कामगिरी
- पालकांचा असंतोष

**उपाय - शाळा संकुल(स्कूल कॉम्प्लेक्स ) मधून तज्ञ शिक्षकांची मदत घेणे,** पालक संवाद वाढविणे, पालकांचा सहभाग घेणे

**२) शिक्षक व्यवस्थापनाचे आव्हान-**

**समस्या -**

- शिक्षकांची कमतरता
- अतिरिक्त कामाचा ताण
- शिक्षकांमध्ये प्रेरणेचा अभाव
- नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास विरोध
- सतत प्रशिक्षणाची गरज

**मुख्याध्यापकाची भूमिका – उपाय**

- **Team building**
- **Motivation**
- **Classroom observation**
- **Conflict management**

**3 ) प्रशासकीय व कागदोपत्री कामाचा ताण -**

**समस्या -•**

- मुख्याध्यापकांना अनेक ऑनलाईन पोर्टल व अहवाल हाताळावे लागतात जसे,
- यु-डायस, सरल, पी एफ एम एस, शालार्थ,स्कॉलरशिप पोर्टल, मिड डे मिल रिपोर्ट, विविध सर्वेक्षण इ.

**परिणाम -** शैक्षणिक नेतृत्वासाठी कमी वेळ, मानसिक ताणतणाव,अनेक राज्य अहवालानुसार मुख्याध्यापकांचा मोठा वेळ प्रशासकीय कामात खर्च होतो.

**उपाय - कार्याचे वितरण करणे, सहकारी शिक्षकांना क्षमतेनुसार कार्य विभागणी करून देणे**

**4 ) NEP अंमलबजावणी चे आव्हान -**

**नवीन बदल - •**

- Experience learning,
- Multidisciplinary Education,
- Skill based learning
- Vocational education
- F L N ( Foundational literacy and numeracy )

**समस्या -** •शिक्षक प्रशिक्षण अपुरे

- संसाधनाची कमतरता
- ग्रामीण भागात डिजिटल साधने अपूरी
- पालकांमध्ये जागृकतेचा अभाव

**उपाय - विविध नवीन बदल स्वीकृत करणे, त्यासंबंधीचे प्रशिक्षण घेणे**

**5) डिजिटल शिक्षणाचे आव्हान -**

**समस्या -** आय सी टी साधनांची कमतरता,इंटरनेट समस्या,स्मार्ट क्लासरूम चा अभाव,सायबर सेफ्टी चे ज्ञान कमी,शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल डिव्हाइड, विशेषतः ग्रामीण भागात - वीज समस्या, उपकरणांची कमतरता, तांत्रिक सहाय्याचा अभाव

**उपाय -** समाज सहभागातून डिजिटल सुविधा उपलब्ध करून घेणे

**6) विद्यार्थी वर्तन आणि मानसिक आरोग्य -**

**वाढती आव्हाने -** मोबाईल चे व्यसन,सोशल मीडियाचा प्रभाव, नैराश्य व ताण, शिस्त विषयक समस्या, हिंसक वर्तन आत्मविश्वासाचा अभाव . .

**मुख्याध्यापकांसाठी उपाय -** समुपदेशन व्यवस्था करणे,सुरक्षित व सकारात्मक वातावरण निर्माण करणे,पालक सहकार्य वाढवणे.

**7) पालक व समाज अपेक्षा -**

**समस्या -** शाळेकडून उच्च निकालाची अपेक्षा,इंग्रजी माध्यमाबद्दल आकर्षण, सरकारी शाळांबद्दल गैरसमज व सतत तुलना

**परिणाम-** विद्यार्थ्यांची घटती संख्या, प्रवेश टिकून ठेवण्याचे आव्हान

**8) आर्थिक व संसाधन व्यवस्थापन -**

**समस्या -** निधी अपुरा,इमारत दुरुस्ती, प्रयोगशाळा साहित्य,ग्रंथालय सुविधा,स्वच्छता व पाणी सुविधा.

**उपाय -** सीएसआर सहकार्य, लोकसहभाग,स्कूल डेव्हलपमेंट प्लॅन

**9) समावेशक शिक्षण (inclusive education)**

**आव्हान -** विशेष गरजांच्या विद्यार्थ्यांसाठी असुविधा,प्रशिक्षित विशेष शिक्षकांची कमतरता,Braille / Assistive Technology चा अभाव

**10 ) मुख्याध्यापकांसाठी उदयोन्मुख नवीन आव्हाने :**

**अ ) AI व तंत्रज्ञान** -

- आर्टिफिशल इंटेलिजन्सी आधारित शिक्षण समजून घेणे, .
- डिजिटल इथिक्स समजून घेणे,
- विद्यार्थ्यांचे स्क्रीन टाईम नियंत्रण करणे

**ब) करिअर गाईडन्स -**

- विद्यार्थ्यांना योग्य करियर मार्गदर्शन 3पलब्ध करून देणे

**क ) 21 व्या शतकातील कौशल्य**

- चिकित्सक विचार
- सर्जनशीलता
- सहयोग
- संप्रेषण

## मुख्याध्यापकांनी विकसित करावयाची कौशल्ये व त्याचा उपयोग -

| **कौशल्य** | **उपयोग** |
|---|---|
| भावनिक बुध्दिमत्ता | शिक्षक व पालक संवाद |
| Instructional नेतृत्व | गुणवत्तापूर्ण अध्यापन |
| संघर्ष निर्मुलन | शालेय समस्या सोडवणे. |
| टेक्नोलोजी लिडरशीप | डिजिटल व्यवस्थापन |
| strategic planning | दीर्घकालीन विकास |
| SMART goal planning | उदिष्टपूर्ती |

आजचा मुख्याध्यापक हा SMART ध्येयांच्या अंमलबजावणीचे केंद्रबिंदू आहेत तसेच ते प्रशासक,शिक्षक मार्गदर्शक, तंत्रज्ञान समन्वयक,समुपदेशक, समाज नेता,परिवर्तनकर्ता या सर्व भूमिका एकाच वेळी पार पाडत आहे.त्यामुळे उपाययोजकात्मक स्तरावर मुख्याध्यापकांनी स्व-विकास व स्मार्ट ध्येये याचे महत्व ओळखून स्वत: साठी तयार राहिला पाहिजे. त्यासाठी नवनवीन ज्ञान आत्मसात करणे,सतत नेतृत्व प्रशिक्षण घेणे व अद्ययावत राहणे,मानसिक आधार घेणे,ताणतणावाचे व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे, कार्यावितरणाद्वारे प्रशासकीय भार कमी करणे,डिजिटल सहाय्य घेणे, सहयोगी शैक्षणिक व्यवस्था याची मदत घेणे, समाज सहभाग चे महत्व, CSR द्वारे लाभ, संवाद कौशल्य या व सर्व अनुषंगिक बाबी लक्षात घेतल्या पाहिजे यातून स्व सक्षमीकरण करून शालेय परिवर्तन करण्यात अग्रेसर राहिले पाहिजे .

**संदर्भ यादी -**


**मराठी आवृत्ती -**

1. नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, संचालक,राज्य शैक्षणिक संशोधक प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे - जाने 2018
2. बालकांचा विकास व स्व ची जाणीव,सुविचार प्रकाशन मंडळ,डॉ.ह. ना.जगताप,डॉ. अश्विनी बोंदार्डे
3. स्व विकास व कलारसास्वाद, म.रा.पा नि. अ सं मंडळ पुणे, मार्च 2018
4. जीवन शिक्षण, रा. शै. सं. प्र.प. महाराष्ट्र,पुणे
5. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण,शिक्षक मार्गदर्शिका,राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
6. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा 2010
7. राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण 2024
8. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार •राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005
9. यशाची गुरुकिल्ली शिव खेरा
10. मिपा व निपा स्तरावरील मोड्यूल्स

**इंग्रजी आवृत्ती :-**

- NISHTHA Leadership package NCERT
- School leadership development, A Handbook NCSL, NUEPA,Feb . 2014
- Pedagogical Leadership: A Handbook for Leading Learning in School, NIEPA,New Delhi.

**Website-**

dsel-education.gov.in

itpd.ncert.gov.in

Central Institute of Educational Technology | A Constituent unit of NCERT

NCSL (niepa.ac.in)

Coursera | Courses, Professional Certificates, and Degrees Online

https://maharashtraboardbooks.com

https://www.ncertbooks.guru

https://www.nishtha.ncert.गोवा

State Council of Educational Research and Training (MSCERT), Maharashtra (maa.ac.in)

https://www.scribd.com

https://www..samsidh.in

Home | Oxford University Careers Service

https://global.utexas.edu.TexasGlobal

https://www.sciencedirect.com

**मोड्यूल विकसक**
**श्रीमती.संघमित्रा विलास त्रिभुवन**
वरिष्ठ अधिव्याख्याता
**प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई**

**समन्वयन**
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
**प्रशासकीय अधिकारी**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**

**मार्गदर्शन**
**श्री.प्रकाश मुकुंद**
**संचालक**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**